cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६७ | रविवार दि.०६ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### डीजेचा दणदणाट आणि सरकारची दुटप्पी शांतता!

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि परंपरेचा उत्सव आहे. पण श्रद्धेच्या नावाखाली ध्वनी प्रदूषणाचा उन्माद सुरू झाला आणि डीजेच्या दणदणाटाने रुग्ण, वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे जगणेच हैराण झाले, तर त्याला 'उत्सवाचा उत्साह' म्हणायचे की कायद्याची उघडपणे खिल्ली? हा प्रश्न आता महाराष्ट्राने सरकारला विचारण्याची वेळ आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीजेमुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे मान्य केले आहे. पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री म्हणून ही भूमिका स्वागतार्ह आहे. पण सरकारचे काम केवळ आवाहन करण्यापुरते आहे का? कायदे असताना त्यांची अंमलबजावणी कोण करणार? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई कोण करणार? प्रशासनाला आदेश देण्याची जबाबदारी कोणाची?

## थोडक्यात...

### लष्कर–ए–तैयबाचा पाकिस्तानी दहशतवादी यासिर ठार

**श्रीनगर :** जम्मू–कश्मीरमध्ये दहशत वाद्यांविरोधात सुरक्षादलांची कारवाई सुरू असून, 'ऑपरेशन अशदार'दरम्यान लष्कर–ए–तैयबाचा पाकिस्तानी दहशतवादी यासिर ठार झाला आहे. जम्मू–कश्मीर पोलिसांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली. यासिर हा पाकिस्तानी नागरिक असून, तो लष्कर–ए–तैयबाच्या सुलेमान मूसा गटाशी संबंधित होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. यासिर यूसमर्ग परिसरात लष्कर–ए–तैयबाचा प्रमुख कमांडर म्हणून सक्रिय असल्याची माहिती समोर आली आहे. सुरक्षा यंत्रणा त्याच्या हालचालींवर गेल्या काही काळापासून लक्ष ठेवून होत्या. 'ऑपरेशन अशदार'ची सुरुवात गुरुवारी, ३ सप्टेंबर रोजी, बडगाम जिल्ह्यातील अशदार गली परिसरातील दुर्गम डोंगराळ आणि घनदाट जंगलात करण्यात आली. भारतीय लष्कराच्या चिनार कोर, जम्मू–कश्मीर पोलिस आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

### न्यायिक अधिकाऱ्यांचे निवृत्तीवय ६० वरून ६२ वर्षे

**मुंबई :** महाराष्ट्रासह छत्तीसगड, कर्नाटक, मध्य प्रदेश, सिक्कीम, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या ७ राज्यांमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधिशांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यासाठी संबंधित राज्यांनी त्यांच्या नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. देशातील जिल्हा न्यायालयांमध्ये तब्बल ५.१८ कोटी खटले प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय घेतला. खंडपीठाने १ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशात संबंधित राज्य सरकारांना त्यांच्या सेवा नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश दिले. मात्र ज्या राज्यांना हा आदेश मान्य नाही त्यांच्यासाठी पुढील सुनावणी १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्रासह छत्तीसगड, कर्नाटक, मध्य प्रदेश, सिक्कीम, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांमध्ये अनुभवी न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### मुंबईत दहीहंडीवेळी ७ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

**मुंबई :** मालाडच्या मालवणी रोडवरील एकता वेल्फेअर सोसायटीत मन हेलावणारी घटना घडली असून, मालवणी येथे दहीहंडीच्या कार्यक्रमादरम्यान भिंतीचा कॉलम कोसळून ७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडली. माहितीनुसार, चिकुवाडी, मालवणी, मार्वे रोड येथील एकता वेल्फेअर सोसायटीतील दहीहंडीचा उत्सव सुरू होता. काही मुले दहीहंडी फोडत होती, यासाठी दोरी एका झाडाला तसेच तळमजल्यावरील बांधकामाच्या विटांच्या कॉलमला बांधण्यात आली होती. दहीहंडी फोडण्याच्या प्रयत्नादरम्यान अचानक विटांचा कॉलम कोसळला आणि त्याखाली ७ वर्षीय रुद्र कदम हा मुलगा अडकला. या दुर्घटनेत त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेनंतर रुद्रला तातडीने हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी रुद्रला दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. उत्सवादरम्यान घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.५० क्विंटल | २,५५१ | २,८०० | २,६७५ |
| ज्वारी/हायब्रिड: ८५.०० क्विंटल | १,५०० | ३,८४५ | २,८३० |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ३३.०० क्विंटल | ७,३०० | ८,२६० | ८,०६२ |
| उडीद : २३.५० क्विंटल | ८,२५० | ८,२५० | ८,२५० |
| बाजरी: १८.०० क्विंटल | २,२१० | २,७९५ | २,६१२ |
| मुग: १०.०० क्विंटल | ९,२५० | १०,०९२ | ९,४५२ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,१०० | ६,९०० | ६,००० |

# ३२ साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांचे २०१ कोटी थकीत

## एफआरपीसाठी आरआरसी कारवाईही निष्फळ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी अद्याप कायम असून, मागील गाळप हंगामात ऊस पुरवठा केलेल्या ३२ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची तब्बल २०१ कोटी रुपयांची एफआरपी रक्कम अद्याप अदा केलेली नाही. विशेष म्हणजे, एफआरपी थकविलेल्या १५ साखर कारखान्यांवर महसूल वसुली प्रमाणपत्र अर्थात आरआरसीची कारवाई करण्यात आली आहे. मात्र, या कारवाईनंतरही शेतकऱ्यांना त्यांची थकीत



रक्कम मिळालेली नसल्याचे चित्र आहे.

गत गाळप हंगामात राज्यातील २१० साखर कारखाने सुरू झाले होते. हंगाम संपून काही कारखान्यांना पाच, काहींना सहा तर काही कारखाने बंद होऊन सात महिन्यांचा कालावधी उलटला आहे. गाळप हंगाम संपल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या उसाची एफआरपी वेळेत मिळणे अपेक्षित असते. मात्र, अनेक शेतकरी अद्यापही थकीत ऊसबिलाच्या प्रतीक्षेत आहेत. गाळप हंगाम संपल्यानंतर कारखानदार पुढील हंगामाच्या तयारीला लागले आहेत. काही कारखान्यांनी एफआरपीपेक्षा अधिक दराने ऊसदराची देयके चुकती करून पुढील गाळप हंगामासाठी ऊस उपलब्धतेचे नियोजन सुरू केले आहे. ◀◀ पान २ वर

### थकीत एफआरपी तातडीने देण्याची मागणी

दरम्यान, साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची थकीत एफआरपी तातडीने अदा करावी, तसेच ज्या कारखान्यांनी वारंवार एफआरपी थकवली आहे, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ऊस उत्पादक शेतकरी करत आहेत. आरआरसी कारवाई करूनही रक्कम वसूल होत नसेल तर प्रशासनाने पुढील कठोर पावले उचलून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळवून द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मागील हंगामातील २०१ कोटी रुपयांची थकबाकी कायम असताना नवीन गाळप हंगाम सुरू करण्याची तयारी करणाऱ्या कारखान्यांवर शासन आणि संबंधित यंत्रणांनी लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

# एकनाथ शिंदेंना गोरगरीब मराठ्यांचा तळतळाट लागणार !

## जरांगे पाटलांचा हल्लाबोल, म्हणाले मंत्री लबाड

**जालना । प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांनी पाप केले आहे. त्यांना गोरगरीब मराठ्यांचा खूप तळतळाट लागणार असल्याची टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. सरकार वेड्यात काढत आहे, आम्ही जातो आणि ते ऐकत नाहीत असे म्हणत आहेत. फडणवीस मराठ्यांवर वार करु नका, तुम्ही विमानात बसून उडून जाताल आणि ते दंगली लावतील असेही जरांगे म्हणाले.



आमचे हक्काचे आम्हाला द्या, ओबीसींचा टक्का आम्हाला नको असेही ते म्हणाले.

भाजपमध्ये सहा गट आहेत. प्रत्येकाला वाटते त्याचे नाव येऊ नये. त्यांच्यात ओढाताण आहे. भाजपमध्ये एकमेकांना संपवत आहेत, असेही जरांगे पाटील म्हणाले. संभाजीनगरला जाऊन नुसत्या बैठका घ्यायच्या. मिडीयात दाखवायचे आणि तातडीने मंत्री फडणवीस यांच्याकडे गेलो काहीतरी आदेश होण्याचा अंदाज आहे, असे फक्त दाखवायचे असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. जसे काही गोकुळात राहतात आणि तिथे बसून दही काढतात का? असा टोला देखील मनोज जरांगे ◀◀ पान २ वर

### आंदोलकांनी आ. गोपीचंद पडळकरांचा ताफा रोखला

सोलापूर–रत्नागिरी महामार्गावर कामती येथे मराठा आंदोलकांनी भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचा ताफा अडवला. यावेळी आंदोलकांनी मराठा आरक्षणाबाबत तसेच मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करण्याची मागणी पडळकर यांच्याकडे केली. आंदोलकांच्या मागणीनंतर गोपीचंद पडळकर यांनी मराठा आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. मराठा समाजाच्या एसइबीसी आणि कुणबी आरक्षणाला आमचा कायम पाठिंबा आहे, असे त्यांनी सांगितले. मात्र, खाडाखोड केलेला कुणबी दाखला रद्द होणार आहे, अशी भूमिकाही पडळकर यांनी यावेळी मांडली. पडळकर यांनी मराठा आरक्षणाला पाठिंबा दर्शवल्यानंतर उपस्थित मराठा आंदोलकांनी त्यांचे स्वागत केले.

## अग्रवाल हत्या प्रकरणात तिसऱ्या आरोपीला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

**अटकेतील रितेश हिंगे मूळचा बीडचा**

पुण्यातील केतन अग्रवाल हत्या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणात पोलिसांनी आणखी एका आरोपीला अटक केली असून, त्यामुळे हत्याकांडातील आरोपींची संख्या तीन झाली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव रितेश हिंगे असून तो मुख्य आरोपी चेतन चौधरीचा वर्गमित्र असल्याचे समोर आले आहे.

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, १८ जून रोजी लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवाल यांची हत्या करण्यात आली होती. या हत्येच्या कटाची रितेशला आधीपासून माहिती होती का, ◀◀ पान २ वर

# भारताच्या उद्योगविश्वात खळबळ सुभाष चंद्रांविरोधात गुन्हा दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**

मीडिया व्यावसायिक सुभाष चंद्र यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन हाउसिंग फायनान्स लिमिटेडकडून कर्ज मिळवण्यासाठी संपत्तीचे मूल्य फुगवून दाखवल्याच्या आरोपावरून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील कर्जे थकीत झाल्याने सार्वजनिक क्षेत्रातील या कर्जदात्याचे १,३२२ कोटी रुपयांहून



अधिक नुकसान झाल्याचा आरोप आहे.

कंपनीच्या तक्रारीनुसार, चंद्र यांनी सादर केलेल्या नेटवर्थ प्रमाणपत्रांच्या आधारे एकूण ९८० कोटी रुपयांच्या दोन कर्जांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये वसंत सागर प्रॉपर्टीजला ५०० कोटी रुपये आणि डिजिटल सबस्क्रायबर मॅनेजमेंट अँड कन्सल्टन्सी सर्व्हिसेसला ४८० कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले होते. या दोन्ही कर्जांसाठी संबंधित कंपन्यांसोबत इतर कंपन्या सह–कर्जदार होत्या. वसंत सागर प्रॉपर्टीजला देण्यात आलेले ५०० कोटींचे कर्ज गृहकर्जाच्या स्वरूपात टेकओव्हर, टॉप–अप आणि व्यवसाय विस्तारासाठी मंजूर करण्यात आले होते. या कर्जासाठी २८ मार्च २०१८ रोजी सुभाष चंद्र यांनी हमी दिली होती. तर ४८० ◀◀ पान २ वर

# संजय राऊतांवर तुरुंगात विषप्रयोग?

## राऊत यांच्या दाव्याने राजकारणात खळबळ

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तुरुंगातील काळ आणि त्यानंतर उद्भवलेल्या आरोग्याच्या समस्यांबाबत मत व्यक्त केले आहे. तुरुंगात असताना आपल्या अन्नातून काही घातक पदार्थ शरीरात गेले असण्याची शक्यता असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही आपल्याला सावध



करत टॉक्सीक टेस्ट करून घेण्याचा सल्ला दिल्याचे राऊत यांनी सांगितले.

राऊत म्हणाले की, तुरुंगात असताना एखाद्या कैद्याच्या खाण्यापिण्यात हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा संशय केवळ माझ्यापुरता मर्यादित नसून तुरुंगात असलेल्या अनेक राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या बाबतीत अशी भीती असू शकते. सरकारकडे सत्ता आणि यंत्रणा असल्याने तुरुंगातील व्यक्तीबाबत काहीही घडू शकते, असा आरोपही त्यांनी केला. ◀◀ पान २ वर

# अमेरिकेनंतर आता लंडनमध्येही मोहन भागवत यांच्या कार्यक्रमाला विरोध

**लंडन / वृत्तसंस्था**

सरसंघचालक मोहन भागवत यांच्या आगामी लंडन दौऱ्याला आणि कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र विरोधाचा सामना करावा लागत आहे. अमेरिकेतील वादानंतर आता लंडनमध्येही त्यांच्या कार्यक्रमावरून विरोधाचे सूर उमटले आहेत. सुमारे २० नागरी समाज संघटनांनी लंडनचे महापौर सादिक खान यांना पत्र लिहून ग्रेटर लंडन अथॉरिटीने संघाच्या कार्यक्रमांवर बहिष्कार टाकावा, अशी मागणी केली आहे.

सरसंघचालक मोहन भागवत यांनी लंडनमधील मंदिर आणि गुरुद्वारे दौऱ्याला सुरुवात केली आहे. आरएसएसच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने अमेरिका, कॅनडा आणि युकेमध्ये सध्या सुरू असलेल्या संपर्क



मोहिमेचा हा दौरा एक भाग आहे. भागवत या दौऱ्यादरम्यान विविध धर्मांचे नेते, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि इतर मान्यवरांची भेट घेणार आहेत. गेल्या आठवड्यात लंडनस्थित अनेक हिंदू संघटनांनीही या कार्यक्रमाला विरोध दर्शवला होता. या दौऱ्यादरम्यान मोहन भागवत लंडनमध्ये ◀◀ पान २ वर

# राजघाटावरच होणार माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे स्मारक

**दिल्ली / वृत्तसंस्था**

दिल्ली अर्बन आर्ट्स कमीशनने राष्ट्रीय स्मृति स्थल येथे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या प्रस्तावित स्मारकाच्या बांधकामाच्या प्रस्तावाला अधिकृत मंजुरी दिली आहे. सेंट्रल पब्लिक वर्क डिपार्टमेंटने हा प्रस्ताव सादर केला होता. २५ ऑगस्ट रोजी झालेल्या आयोगाच्या बैठकीत या प्रकल्पाच्या डिझाईन, लँडस्केप, साहित्याचा दर्जा आणि लोकांच्या रहदारीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. राजघाट परिसराच्या ऐतिहासिक आणि वास्तुशिल्प महत्त्वाशी सुसंगत राहूनच या स्मारकाचे निर्माण करावे, असे स्पष्ट निर्देश प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले आहेत.

नव्या स्मारकाचे डिझाईन, वापरण्यात येणारे साहित्य, रंगसंगती आणि लँडस्केपिंग राष्ट्रीय स्मृति स्थलवरील आधीपासून अस्तित्वात असलेल्या समाधींच्या स्वरूपाशी जुळणारे



असावे, अशी मुख्य अट आयोगाने घातली आहे. परिसराची एकरूपता कायम राखण्यासाठी पांढरा मार्बल किंवा पांढरा ग्रॅनाइट वापरण्यावर विचार करावा, तसेच त्याचे स्वरूप आधीच्या स्मारकांशी ताडून पाहावे, असेही सांगण्यात आले आहे. आवास आणि शहरी मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या लँड अँड डेव्हलपमेंट ऑफिसच्या सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक असणार आहे. या प्रकल्पात पर्यावरण संवर्धनालाही विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. साइटवर आधीपासून असलेला वृक्ष सुरक्षित ठेवावा लागेल आणि त्याच्या मुळांना किंवा वाढीला कोणताही धोका निर्माण न करता तो डिझाइनमध्ये सामावून घ्यावा लागेल. तसेच, पादचाऱ्यांच्या सोयीसाठी स्मारकाकडे जाणाऱ्या मार्गाच्या दोन्ही बाजूंनी बाकड्यांची सोय करणे आणि पाहुण्यांना शूज काढण्यासाठी विशेष जागा उपलब्ध करून देत त्या जुन्या–नवीन पादत्राणांना पावसापासून वाचवण्यासाठी योग्य व्यवस्था करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या बाउंड्री ट्रीटमेंट, रेलिंग, रस्ते, सायनेजेस आणि इतर घटकांचे डिझाईन राजघाटच्या एकूण सौंदर्याशी मिळतेजुळते असावे. या मंजुरीमध्ये केवळ वास्तुकला आणि शहरी डिझाईनचा समावेश असून, इतर सर्व कायदेशीर आणि लँड विभागाच्या अटींचे पालन करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकाऱ्यांवर असणार आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा सन्मान

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्तापूर्ण अध्यापन, संशोधन आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ ने गौरव करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्कारांचे शनिवारी वितरण करण्यात आले.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभाग आणि उच्च



शिक्षण विभाग तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. देशभरातील ४८ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक आणि १३ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षक, अशा एकूण ८२ शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पुरस्कारार्थींना प्रमाणपत्र, पदक आणि ५० हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, शिक्षण राज्यमंत्री डॉ.सुकांत मजूमदार, कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव अनिल कुमार, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, चारित्र्याला आणि विचारांना आकार देऊन सशक्त राष्ट्राची पायाभरणी करतात, असे त्यांनी सांगितले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या स्मृतीस अभिवादन करताना राष्ट्रपतींनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, रवींद्रनाथ टागोर आणि गोपाळबंधू दास यांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. अंदमान–निकोबारपासून लडाखपर्यंत दुर्गम आणि ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाचे त्यांनी कौतुक केले. भारताला जगाची ज्ञान आणि कौशल्याची राजधानी बनविण्यासाठी प्राथमिक स्तरापासूनच ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# डीजेचा दणदणाट आणि सरकारची दुटप्पी शांतता!

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि परंपरेचा उत्सव आहे. पण श्रद्धेच्या नावाखाली ध्वनी प्रदूषणाचा उन्माद सुरू झाला आणि डीजेच्या दणदणाटाने रुग्ण, वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे जगणेच हैराण झाले, तर त्याला 'उत्सवाचा उत्साह' म्हणायचे की कायद्याची उघडपणे खिल्ली? हा प्रश्न आता महाराष्ट्राने सरकारला विचारण्याची वेळ आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीजेमुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे मान्य केले आहे. पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री म्हणून ही भूमिका स्वागतार्ह आहे. पण सरकारचे काम केवळ आवाहन करण्यापुरते आहे का? कायदे असताना त्यांची अंमलबजावणी कोण करणार? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई कोण करणार? प्रशासनाला आदेश देण्याची जबाबदारी कोणाची?

मुख्यमंत्र्यांनीच नागरिकांच्या त्रासाची कबुली दिली असेल, तर त्यानंतरही कर्णकर्कश डीजे सुरूच राहणार असतील, तर मग मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाची किंमत काय? सरकारचा आवाज डीजेपेक्षा कमी का पडतोय? ध्वनी प्रदूषणाचे नियम काही आज निर्माण झालेले नाहीत. न्यायालयीन निर्देश आहेत, कायदेशीर मर्यादा आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन व पोलीस यंत्रणा आहे. मग प्रत्येक वर्षी गणेशोत्सव आला की सरकारने नागरिकांना पुन्हा विनंती करायची आणि नियम मोडणाऱ्यांना राजकीय, सामाजिक किंवा प्रशासकीय मोकळीक मिळायचीहा कोणता कारभार? कायदा सर्वांसाठी समान असेल तर तो गणेश मंडळांनाही लागू झाला पाहिजे आणि राजकीय नेत्यांनाही. उत्सवाच्या नावाखाली कायद्याला सुट्टी देता येणार नाही. याहून गंभीर बाब म्हणजे सत्ताधारी व्यवस्थेतच या प्रश्नावर एकवाक्यता आहे का, हा प्रश्न. मुख्यमंत्री एका बाजूला डीजेमुळे होणाऱ्या त्रासाबाबत चिंता व्यक्त करतात; दुसरीकडे सत्ताधारी पक्षातील काही नेते डीजेबंदीवर पुनर्विचाराची मागणी करतात. मग पोलिसांनी नेमके कोणाचे ऐकायचे? मुख्यमंत्र्यांचे की स्थानिक राजकीय नेत्यांचे? ही केवळ राजकीय मतभिन्नता नाही. याचा थेट परिणाम कायदा-सुव्यवस्थेवर होतो. कारण मैदानावर कारवाई करणारा पोलीस अधिकारी असतो. त्याच्यावर वरून आदेशांचा दबाव असेल आणि राजकीय पातळीवर वेगवेगळे संदेश जात असतील, तर नियमांची अंमलबजावणी कशी होणार? म्हणूनच आणखी एक अस्वस्थ करणारा प्रश्न समोर येतो, फडणवीस आपल्या सरकारमधील संबंधित पालकमंत्र्यांना विश्वासात घेत आहेत का?

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात गणेशोत्सवाची परिस्थिती वेगळी आहे. कुठे मोठ्या मिरवणुका आहेत, कुठे संवेदनशील भाग आहेत, कुठे रुग्णालये आणि निवासी परिसर आहेत, तर कुठे वाहतुकीचा प्रश्न गंभीर आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासन यांच्यात स्पष्ट समन्वय असणे आवश्यक आहे. जर हा समन्वय होत असेल, तर सरकारची भूमिका एकसंध का दिसत नाही? आणि जर समन्वय होत नसेल, तर राज्यातील संवेदनशील विषयांवर सरकारचे नियंत्रण नेमके कुठे आहे? मुख्यमंत्री एक बोलतात, सत्ताधारी पक्षातील नेते दुसरे बोलतात आणि प्रशासन संभ्रमात पडतेही परिस्थिती महाराष्ट्रासाठी धोकादायक आहे. राजकारणासाठी काही तासांचा डीजेचा आवाज महत्त्वाचा असेल; पण सामान्य नागरिकासाठी तो संपूर्ण रात्र त्रासदायक ठरू शकतो. रुग्णाला विश्रांती हवी असते. वृद्धाला शांत झोप हवी असते. विद्यार्थ्याला अभ्यासासाठी शांत वातावरण हवे असते. लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. रुग्णालय परिसरात तर ध्वनी प्रदूषणाचा प्रश्न अधिक संवेदनशील आहे. मग प्रश्न असा, काही मंडळांच्या उत्साहासाठी लाखो नागरिकांच्या शांततेचा बळी का? परंपरा जपण्याच्या नावाखाली नियम मोडण्याला सरकारने संरक्षण दिले तर उद्या कोणताही नियम 'भावनेच्या' नावाखाली झुगारून देता येईल. वाहतूक नियमांपासून ध्वनी प्रदूषणापर्यंत प्रत्येक कायदा मग राजकीय सोयीचा विषय बनेल. सरकारने हे थांबवले पाहिजे. मुंबईत एक भूमिका, पुण्यात दुसरी, नागपुरात तिसरी आणि ग्रामीण भागात चौथी, असा कायद्याचा महाराष्ट्र होऊ नये. कायद्याला शहर, जिल्हा, मंडळ किंवा राजकीय ओळख नसते. मुख्यमंत्र्यांनी आता केवळ आवाहन करून थांबण्याची वेळ संपली आहे. ध्वनी मर्यादा ओलांडणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया कठोर करावी. धोकादायक लेझर लाईट्सच्या वापरावर नियंत्रण आणावे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कारवाई करताना कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडू नये. सत्ताधारी पक्षातील नेत्यांनाही मुख्यमंत्री एक स्पष्ट संदेश देणार का. उत्सव कोणाचाही असो, कायदा मोडण्याची परवानगी कोणालाही नाही? हा संदेश दिल्याशिवाय सरकारच्या आवाहनाला गांभीर्य येणार नाही. कारण नागरिकांना सरकारकडून भाषणे नकोत; कृती हवी आहे. प्रशासनाला संदिग्ध राजकीय संकेत नकोत; स्पष्ट आदेश हवेत. पोलिसांना 'कोणाचा दबाव?' हा प्रश्न नको; कायद्याची अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य हवे.

डीजेचा दणदणाट काही तासांचा आहे. पण सरकारच्या भूमिकेतील दुटप्पीपणा लोकांच्या मनात दीर्घकाळ घुमू शकतो. आज महाराष्ट्रासमोर त्यामुळे प्रश्न फक्त डीजेचा नाही. प्रश्न आहे सरकारच्या इच्छाशक्तीचा. फडणवीस सरकार नागरिकांच्या आरोग्याच्या आणि शांततेच्या अधिकारासाठी उभे राहणार आहे की उत्सवाच्या नावाखाली होणाऱ्या राजकीय दबावापुढे माघार घेणार आहे? मुख्यमंत्र्यांनी आता निवड स्पष्ट करावी, कारण महाराष्ट्राला उत्सव हवा आहे, ध्वनी दहशत नाही. परंपरा हवी आहे, कायद्याची पायमल्ली नाही. आणि सरकार हवे आहे, राजकीय दबावापुढे मौन धारण करणारे प्रशासन नव्हे. डीजेचा आवाज बंद होईलही; पण त्याआधी सरकारच्या इच्छाशक्तीचा आवाज ऐकू आला पाहिजे.

# भाजप युवा मोर्चाच्या बीड जिल्हा कोषाध्यक्षपदी केशव बडेंची निवड

बीड । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील खांबा-लिंबा येथील केशव नारायण बडे यांची भाजप युवा मोर्चाच्या बीड जिल्हा कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे, खा.डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्या आदेशानुसार, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजयुमो जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली.



खांबा-लिंबा येथील केशव बडे यांनी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या विचारांवर निष्ठा ठेवत राजकीय व

### निष्ठावंत कार्यकर्त्याला मुंडे भगिनींनी दिला न्याय

सामाजिक कार्यास सुरुवात केली होती. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी १७ वर्षे पक्षसंघटनेत सक्रिय योगदान दिले आहे. बीडमध्ये कार्यालय प्रमुख म्हणून जबाबदारी पाहिली आहे. त्यांच्या प्रामाणिक आणि निष्ठावान कार्याची दखल घेत मुंडे भगिनींनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून केशव बडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यात भाजप युवा मोर्चाचा अधिक विस्तार करण्यासाठी मी प्रयत्नशील राहिल असे सांगत बडे यांनी भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे, खा.डॉ.प्रीतमताई मुंडे, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजयुमो जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांचे आभार मानले आहेत.

# श्री शिवाजी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून गुरुजनांचा गौरव

जालना । प्रतिनिधी

शिक्षक दिनानिमित्त गांधी चमन जवळील श्री शिवाजी हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून गुरुजनांचा गौरव करण्यात आला. शाळेच्या आठवणींमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षक सुद्धा रमून गेले.



मुख्याध्यापक वसंत घुगे यांच्या अध्यक्षतेखाली शाळेत स्वयंशासन दिन , शिक्षकांचा गौरव सोहळा सुरू असतांनाच शाळेत सन १९९९- २००० मध्ये इयत्ता दहावीत शिक्षण घेतलेले विद्यार्थी २६ वर्षानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून पुन्हा आपल्या गुरुजनांचा गौरव करण्यासाठी दाखल झाले. यावेळी मुख्याध्यापक वसंत घुगे ,प्रल्हाद घनगाव, विष्णू खरात, जयंत चव्हाण, दीपक ठाकूर ,गजानन सोनसळे, प्रशांत भाले, लोखंडे, वैराळ, गाडे, श्रीमती कुंडलकर, जोशी, देशमुख, ठोके, यांच्यासह शिक्षकांचा गौरव करण्यात आला.

गुरुजनांनी शाळेत असतांना ज्ञानदानासोबतच दिलेले संस्कार, लावलेली शिस्त ,चुकल्यावर छडीचा प्रसाद देऊन हजारो विद्यार्थ्यांना सरळ केले. त्यामुळेच आज शाळेचे विद्यार्थी विविध क्षेत्रात नावलौकिक करत असून गुरुजनांचे ऋण कदापिही विसरणार नसल्याचे आशीष रसाळ यांनी याप्रसंगी सांगितले. तर शिक्षकांमुळेच आमच्या जीवनाला खरा अर्थ मिळाला आणि आम्ही घडलो असे गजानन रत्नपारखे यांनी नमूद केले. धनंजय म्याका, संजय चौरे, शेख जावेद यांनीही शाळेच्या आठवणींना उजाळा दिला. माजी विद्यार्थ्यांनी अचानकपणे येऊन केलेल्या सत्काराबद्दल शिक्षकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी शिक्षकेतर कर्मचारी ,विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### केजमध्ये छत्रपती शिवाजी

अखेर यश मिळाले असून स्मारकासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. दरम्यान केज येथील शिवछत्रपतींच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मुंबईच्या नंदनवन येथील बंगल्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन संपर्कप्रमुख मनोज शिंदे, उपनेत्या संगीताताई ठोंबरे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, महिला जिल्हाप्रमुख प्रतिभाताई थोरात, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, स्वप्नील गलधर, चंद्रकांत नवले, विजयप्रकाश ठोंबरे यांनी आभार मानले.

सर्वांच्या एकजुटीच्या प्रयत्नांना यश

केज येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी निधी मंजूर होणे हे शिवप्रेमी, शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे यश आहे. शासन आदेश पारित झाल्याने आता स्मारक उभारणीच्या पुढील प्रक्रियेलाही वेग येणार आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक व केज तालुक्यातील शिवप्रेमींच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

### गोदावरी पात्रातून होणाऱ्या

गोदावरी नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा करून दोन हायवा गुळज ते उमापूरच्या दिशेने येत असल्याची खात्रीशीर गुप्त माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने तातडीने उमापूर शिवारात सापळा लावला. यावेळी संशयितरित्या येणारे भारत बेंझ कंपनीचे दोन वाळूने भरलेले हायवा अडवून तपासणी केली असता, त्यांच्याकडे वाळू वाहतुकीचा कोणताही अधिकृत परवाना आढळून आला नाही. याप्रकरणी हायवा चालक सरफराज राजू पठाण (वय ३० वर्षे, रा. महारटाकळी, ता. गेवराई, जि. बीड) आणि अजिंक्य भागवत तापकीरे (वय २२ वर्षे, रा. उमापूर, ता. गेवराई, जि. बीड) या दोघांविरुद्ध चकलांबा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या () कलम ३०३(२) अंतर्गत अनुक्रमे गु.र.नं. ३०२/२०२६ आणि ३०३/२०२६ नुसार दोन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पोलिसांनी दोन्ही वाहने आणि वाळूसह एकूण ६० लाख ७२ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अर्जुन यादव, पोलीस अंमलदार बबन सलगर, मनोज परजणे आणि अश्पाक सय्यद (सर्व नेमणूक: स्थानिक गुन्हे शाखा, बीड) यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. स्थानिक गुन्हे शाखेच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

### दुष्काळ जाहीर करून

करून शेतकऱ्याला नुकसान भरपाई हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात यावी तसेच कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्यात यावा शेतकरी पिकं वाचतील. राहिलेला शेतकऱ्याचा थकीत पीक विमा तात्काळ देण्यात यावा या मागणी करिता बीड येथे हलगी बजाव आंदोलन ठेवण्याचा निर्णय शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने नाळवंडी येथील बैठकीत घेण्यात आला. यावेळी बैठकीत शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे, माजी सरपंच राधाकिसन मेहेत्रे, आमआआदमी पार्टी चे अण्णासाहेब राऊत, गणेश राऊत,बाबासाहेब काळे. कुंडलिक वाघमारे, शंकर मेहेत्रे , बाबासाहेब जाधव भागवत लेडाळ , दशरथ तांबरे, सुदाम सत्कर, मोहन तांबरे यांच्या सह गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

### महसूल सहाय्यक पदासाठी

राहुल यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकीय सेवेत प्रवेश मिळवत आपल्या कुटुंबासह नाळवडी, ढेकणमोहा परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी राहुल जाधव यांच्या यशाचे कौतुक करत त्यांना पुढील प्रशासकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीची चिंता न करता ध्येय निश्चित करून सातत्याने अभ्यास केल्यास स्पर्धा परीक्षेत यश संपादन करता येते, याचे राहुल जाधव हे उत्तम उदाहरण असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. राहुल जाधव यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची प्रेरणा मिळणार असून, त्यांनी भविष्यातही प्रामाणिकपणे सेवा बजावत आणखी मोठी भरारी घ्यावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. सत्कार कार्यक्रमास नागेश शिंदे माजी सरपंच, डॉ. किशोर वरपे;,भास्कर देवकते माजी संचालक बाजार समिती बीड, ज्ञानेश्वर जाधव माजी सरपंच मानकुरवाडी, माऊली देवकते, बाळासाहेब वाघमारे, शुभांगी शिंदे ,सोनाली शिंदे, दिलीप शिंदे, गौतम ढवळे, रोहित कानाडे, जगन्नाथ शिंदे, प्रकाश शिंदे, विलास जाधव, अभिजित शिंदे, विकास तातेराम शिंदे, संगम शिंदे, सुनील शिंदे यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण भागातून स्पर्धा परीक्षेत यश मिळवत शासकीय सेवेत दाखल झालेल्या राहुल जाधव यांच्या यशाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### नेकनूर येथे शिक्षक दिन

श्री. लूचारे सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राखुंडे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन लोखंडे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे विशेष सहकार्य लाभले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकांविषयी आदर, कृतज्ञता आणि प्रेरणेची भावना निर्माण झाली.

### दोन वर्षांपासून रखडलेला

कामावर लक्ष ठेवले आणि संबंधित अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्याशी समन्वय साधत काम पूर्ण करून घेतले. त्यामुळे दोन वर्षांपासून रखडलेला हा प्रश्न अखेर मार्गी लागला. ''नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लागणे हीच खरी समाधानाची बाब आहे. संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार यांनी केलेल्या सहकार्यामुळे हे काम पूर्ण होऊ शकले,'' अशी भावना सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. विद्युत पोल उभारणी व तारांचे काम पूर्ण झाल्याने प्रशांतनगरमधील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, या कामासाठी पुढाकार घेणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांसह विद्युत विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे नागरिकांकडून आभार मानले जात आहेत. दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने ''पाठपुराव्याला अखेर यश'' मिळाल्याची भावना प्रशांतनगर परिसरातील नागरिकांमध्ये आहे.

### अवैध मुरूम वाहतुकीवर

तपासणी केली असता त्यामध्ये मुरूम भरलेला असल्याचे निदर्शनास आले. चालक कृष्णा वैजनाथ जाधव (रा. वडारवाडा, वडवणी) याच्याकडे चौकशी केली असता सदर मुरूम हा चिंचोटी तलाव परिसरातून अवैधरीत्या उत्खनन करून आणल्याचे समोर आले. तसेच हा मुरूम गोविंद अशोक चाटे (रा. वडवणी) यांचा असल्याचे चालकाने पोलिसांना सांगितले. या प्रकरणी वडवणी पोलिसांनी हायवा व मुरूम असा ३० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच चालक कृष्णा वैजनाथ जाधव व वाहन मालक गोविंद अशोक चाटे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे परिसरातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार तुकाराम ढोबळे करीत आहेत.

सदरची कारवाई श्याम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार हनुमंत कप्पे व नितीन काकडे यांनी केली.

पान १ वरून...

### ३२ साखर कारखान्यांकडून

दुसरीकडे, काही कारखान्यांकडे मागील हंगामातील एफआरपीची रक्कमच थकीत असल्याने संबंधित कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांमध्ये नाराजी वाढत आहे. उसाचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते, औषधे, मजुरी, पाणी आणि वाहतूक यासाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे ऊस कारखान्याला दिल्यानंतर वेळेत बिल मिळणे हे त्यांच्या पुढील शेतीच्या नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. मात्र, बिलासाठी अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत आहे.

एफआरपीची रक्कम थकविणाऱ्या कारखान्यांवर प्रशासनाकडून आरआरसी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईद्वारे संबंधित कारखान्यांकडून थकीत रक्कम महसूल वसुलीच्या माध्यमातून मिळवून ती शेतकऱ्यांना देण्याची प्रक्रिया अपेक्षित असते. मात्र, १५ कारखान्यांवर कारवाई होऊनही थकीत एफआरपीचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. यामुळे आरआरसी कारवाईची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, असा प्रश्न ऊस उत्पादकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यापेक्षा प्रत्यक्ष थकीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील काही कारखान्यांकडे मोठ्या प्रमाणात एफआरपी थकीत आहे. सिद्धेश्वर, सोलापूर या कारखान्याकडे सुमारे २८ कोटी ४४ लाख रुपये, तर श्री संत कूर्मदास, माढा या कारखान्याकडे १३ कोटी ४४ लाख रुपये थकीत आहेत. अन्य कारखान्यांची काही अंशतः थकीत रक्कम धरून सोलापूर जिल्ह्यातील संबंधित कारखान्यांकडील थकबाकी सुमारे ४२ कोटी १२ लाख रुपयांवर असल्याचे सांगण्यात येते. तसेच विठ्ठलसाई, मुरूमकडे १० कोटी ७७ लाख रुपये, जुना भाऊसाहेब बिराजदारकडे ६ कोटी ८२ लाख रुपये, जुना बाणगंगाकडे ५ कोटी ३३ लाख रुपये, तर डीडीएन, कळंबकडे सुमारे १ कोटी रुपये थकीत आहेत. या कारखान्यांकडील एकत्रित थकबाकी सुमारे २३ कोटी ११ लाख रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सांगली जिल्ह्यातील पतंगराव कदम साखर कारखान्याकडे १५ कोटी ८८ लाख रुपये, तर रायगाव शुगरकडे १ कोटी ४६ लाख रुपये थकीत असल्याचे समोर आले आहे. सातारा जिल्ह्यातील ग्रीन पॉवर कारखान्याकडे ७ कोटी ९३ लाख रुपये थकीत आहेत. या थकबाकीमुळे संबंधित कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. पुढील हंगामासाठी शेतीची मशागत, खते-बियाण्यांची खरेदी तसेच इतर खर्च भागविण्यासाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज असताना मागील हंगामातील ऊसबिलच मिळालेले नाही. शेतकऱ्यांचे जुने देणे पूर्ण केल्याशिवाय पुढील हंगामातील व्यवहारांना परवानगी देण्याबाबतही कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### एकनाथ शिंदेंना गोरगरीब

पाटलांनी लगावला. लाडकी बहीण नीट बोलत नाही, ती चप्पल घेऊन तयार आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी नाही, अनुदान नाही, पिक विमा नाही असेही जरांगे म्हणाले. शिंदेंनी लाडकी बहीण आणली, लाडकी बहीण त्यांना खपली नाही. तर फडणवीस यांनी लाडकी दीदी आणल्याचे जरांगे म्हणाले. सरकार सगळ्यांना वेड्यात काढत आहेत. २०२३ पासून २०२६ पर्यंत वेळ नाही तर काय दिला, असा सवाल यावेळी मनोज जरांगेंनी केला. शिंदेंचा गुरु शिरसाट आहे. मराठ्यांच्या नादी लागू नका, ही जात संयमी आहे, तऱ्हाला लागली तर फार विचित्र आहे. सरकारचा डाव आहे असे जरांगे म्हणाले. बावनकुळे यांचे माझे लागले होते तर त्याच्या विरोधात भाजपच्या काही लोकांनी माझ्याकडे गबाळ आणून ठेवल्याचे जरांगे म्हणाले. दरम्यान, गेल्या आठ दिवसापासून मनोज जरांगे पाटील हे अंतरवाली सराटीत उपोषणाला बसले आहेत. कोणत्याही परिस्थितीत आता माघार घेणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण सोडणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. दरम्यान, मराठा समाज आक्रमक झाला असून, राज्यातील विविध ठिकाणी आंदोलने, मोर्चा काढले जात आहेत.

### संजय राऊतांवर तुरुंगात

सुमारे दहा दिवसांपूर्वी राहुल गांधी यांची भेट झाल्याचे सांगत राऊत यांनी या भेटीतील चर्चेची माहिती दिली. आपल्या प्रकृतीबाबत राहुल गांधी यांनी चिंता व्यक्त केली आणि आजाराचे नेमके कारण शोधण्यासाठी टॉक्सीक टेस्ट करून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले, असा दावा राऊत यांनी केला. तुरुंगातून बाहेर आल्यानंतरच आपल्या प्रकृतीच्या समस्या वाढल्याचे राऊत यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आजाराचा संबंध तुरुंगातील परिस्थितीशी आहे का, याची तपासणी होणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. दरम्यान, कोल्हापुरात झालेल्या एका मुलाखतीत राऊत यांनी तुरुंगातील परिस्थितीचा अनुभवही सांगितला. अनेक कैदी एकाच खोलीत राहत होते. पुरेशी हवा, स्वच्छता, पाणी आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी केला. आपण हृदयविकाराचे रुग्ण असूनही तुरुंगातील परिस्थिती अत्यंत त्रासदायक होती, असे राऊत यांनी सांगितले. आपल्या आरोग्याच्या समस्या तुरुंगातून बाहेर आल्यानंतर प्रकर्षाने जाणवू लागल्या आणि त्यामागची कारणे तुरुंगातील काळात शोधावी लागतील, असे त्यांनी नमूद केले. संजय राऊत यांनी केलेल्या या आरोपांमुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्यांबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. मात्र, तुरुंगात विषप्रयोग झाला होता का, याबाबत अद्याप कोणताही वैद्यकीय किंवा अधिकृत पुरावा समोर आलेला नाही. टॉक्सीक टेस्ट चे निष्कर्ष आल्यानंतर या दाव्यांबाबत अधिक स्पष्टता मिळू शकते.

### भारताच्या उद्योगविश्वात

कोटींचे दुसरे कर्ज भाडे उत्पन्नावर आधारित सिक्युरिटायझेशन योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आले होते. त्यासाठीही चंद्र यांची हमी होती.

तक्रारीनुसार, २८ मार्च २०१८ रोजी डीआयएम यांनी दिलेल्या प्रमाणपत्रात सुभाष चंद्र यांची संपत्ती सुमारे ५९,००० कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच ६ जुलै २०१८ रोजी एमपीजे यांनी दिलेल्या दुसऱ्या प्रमाणपत्रात त्यांची नेटवर्थ ४०,५६२ कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले. मात्र, दोन्ही कर्जे पुढे थकीत झाली. दिवाळखोरी आणि नादारी संहिता अंतर्गत झालेल्या पुढील कार्यवाहीदरम्यान चंद्र यांनी या प्रमाणपत्रांमध्ये नमूद केलेली नेटवर्थ आपली नसल्याचे सांगितल्याचा सीबीआयच्या तक्रारीमध्ये उल्लेख आहे.

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

तंत्रज्ञान, नैतिक मूल्ये आणि कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहनही राष्ट्रपतींनी केले. शालेय शिक्षण, उच्च शिक्षण आणि कौशल्य विकास या तीनही क्षेत्रांत महाराष्ट्रातील या शिक्षकांनी आपल्या कार्यातून शिक्षणाच्या गुणवत्तेला नवी दिशा देतानाच वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना, संशोधन आणि रोजगाराभिमुख कौशल्यनिर्मिती यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे - साने गुरुजी निवासी माध्यमिक विद्यालय, बीड. श्रीमती कुंदा जयवंत बच्छाव - महापालिका शाळा, नाशिक. वैभव वसंतराव कुलकर्णी - जवाहर नवोदय विद्यालय, लातूर. शिवप्रसाद अरविंद टिंगरे - सैनिक स्कूल, सातारा. डॉ. विक्रम विशाल - भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई. डॉ. अमर मोहनराव ताकसांडे - जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय, दत्ता मेघे संस्था, वर्धा. डॉ. संदीपान प्रल्हाद नरोटे - शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर. किरण प्रकाश झारकर - शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव आणि अर्चना राकेश जाधव - शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, त्र्यंबकेश्वर, नाशिक महाराष्ट्रातील या नऊ शिक्षकांचा यात समावेश आहे.

### अमेरिकेनंतर आता लंडनमध्येही

राहणाऱ्या भारतीय समुदायाला संबोधित करणार आहेत. संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा आंतरराष्ट्रीय संपर्क अभियान कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. अमेरिका, कॅनडा आणि ब्रिटन या दौऱ्याचा भाग आहेत. यापूर्वी न्यू यॉर्क शहरातल्या मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये 'युनिव्हर्सल ओपननेस सेलिब्रेशन्स' अंतर्गत असाच कार्यक्रम पार पडला होता, जिथे त्यांना मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले होते. महापौरांना पाठवलेल्या पत्रात नागरी समाज संघटनांनी संघाच्या कार्यक्रमासाठी कोणतेही सभागृह किंवा जागा (वेन्यू) देऊ नये, अशी विनंती केली आहे. ब्रिटिश वृत्तपत्र द इंडिपेंडंटनुसार, पत्र लिहिणाऱ्या संघटनांनी आरएसएसला एक हुकूमशाही आणि लष्करी विचारसरणीचा गट असे संबोधले असून तो युरोपीय फॅसिझमपासून प्रेरित असल्याचा आरोप केला आहे. तसेच ब्रिटनच्या बहुसंस्कृतीवादाचे आणि बहुसांस्कृतिक समाजाचे संरक्षण निश्चित करण्याचे आवाहन अधिकाऱ्यांना केले आहे. ब्रिटनच्या परराष्ट्र कार्यालयाला पाठवलेल्या पत्रात हिंदूज फॉर ह्युमन राइट्स, यूके-इंडियन मुस्लिम कौन्सिल, इंडिया लेबर सॉलिडॅरिटी आणि साउथ एशिया सॉलिडॅरिटी ग्रुप यांसह २० संघटनांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

### अग्रवाल हत्या प्रकरणात

याचा तपास सध्या पोलिसांकडून केला जात आहे. चेतन चौधरी आणि त्याची मैत्रीण सिया गोयल यांनी रितेशसोबत केतनच्या हत्येबाबत चर्चा केल्याचा पोलिसांना संशय आहे. केतनची हत्या कशा पद्धतीने करायची, याबाबतही चर्चा झाल्याची माहिती तपासात समोर आल्याचे सांगितले जात आहे. सिया आणि चेतन यांनी रितेशला लोहगडला सोबत येण्यासाठी वारंवार आग्रह केला होता. मात्र, रितेशने त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. केतनच्या हत्येनंतर चेतन चौधरीने रितेशची भेट घेतल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. तसेच सिया गोयलदेखील रितेशच्या संपर्कात असल्याचे तपासात समोर आल्याचे सूत्रांनी सांगितले. चेतन चौधरीच्या मोबाईलमधून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी रितेशचा शोध घेतला आणि त्याला अटक केली. अटक करण्यात आलेला रितेश हिंगे हा बीड जिल्ह्यातील मूळ रहिवासी असल्याची माहिती आहे. तो सध्या पुण्यातील बालेवाडी परिसरातील एका खासगी कंपनीत काम करत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात रितेश चेतन चौधरीच्या संपर्कात होता. त्यामुळे हत्येच्या कटाबाबत त्याला नेमकी किती माहिती होती आणि या संपूर्ण प्रकरणात त्याची भूमिका काय होती, याचा तपास आता पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, तिसऱ्या आरोपीच्या अटकेमुळे केतन अग्रवाल हत्या प्रकरण आता अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. या प्रकरणात आणखी काही धक्कादायक माहिती समोर येते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## श्री. नवनाथ गणपत जाधव यांचे निधन



आष्टी : वटणवाडी येथील श्री. नवनाथ गणपत जाधव वरीष्ठ लिपीक एसटी महामंडळ सेवानिवृत्त कर्मचारी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने जाधव कुटुंबीयांसह नातेवाईक, मित्रपरिवार व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.श्री. नवनाथ जाधव यांच्या पार्थिवावर वटणवाडी येथील सूतगिरणीशेजारील स्मशानभूमीत रात्री उशिरा साडेदहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सगे-सोयरे, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत भावपूर्ण वातावरणात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला. इंजिनियर अमोल जाधव यांच्यावर पितृछत्र हरपल्याने जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात.मुलगी: अर्चना प्रवीण पवार प्रवीण पवार , डायरेक्टर झेन्सार आय टी कंपनी पुणे डॉ अनिता अविनाश पाटील मेडिकल ऑफिसर, कोल्हापूर डॉ अविनाश पाटील मेडिकल ऑफिसर उच्च न्यायालय, कोल्हापूर मुलगा: अमोल नवनाथ जाधव आयटी अभियंता पुणे आदी परिवार आहे.


# राज्य लोकतंत्र

रविवार दि.६ सप्टेंबर २०२६




# उमेदच्या ग्राम सखींना दरमहा १५ तर प्रभाग संघ केडरला २४ हजार मानधन द्यावे

### विविध मागण्यांसाठी सर्व ऑनलाईन कामांवर बहिष्कार, गटविकास अधिकाऱ्यांना दिले निवेदन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत काम करणाऱ्या ग्राम सखींना दरमहा १५ तर प्रभाग संघ केडरला २४ हजार मानधन द्यावे यासह विविध प्रलंबित मागण्या पूर्ण होईपर्यंत ऑनलाईन काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आपल्या मागण्यांचे निवेदन निवेदन आज येथील सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांना दिले आहे.



आपल्या विविध मागण्यांसाठी आज उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुक्यात १६० ग्राम सखी तर ४ प्रभाग केडर कार्यरत आहेत. यासंबंधी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नत अभियानांतर्गत ग्रामीण भागात गावपातळीवर ग्राम सखी म्हणून प्रामाणीकपणे व जबाबदारीने काम करीत आहोत. ग्रामीण भागातील महिला बचत गट ग्रामसंघ, महिला संघटनांना मार्गदर्शन करणे विविध शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे, बचत गटांचे कामकाज व अभियानाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करणे यासाठी सातत्याने कार्य करीत आहेत. मात्र सातत्याने वाढत जाणारा कामाचा ताण, आनलाइन कामकाजाची अतिरिक्त जबाबदारी, मानधन / मोबदला व इतर प्रलंबित प्रश्न यामुळे ग्रामसखी म्हणून काम करणाऱ्या महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उमेदच्या ग्राम सखींना दरमहा १५ तर प्रभाग संघ केडरला २४ हजार मानधन द्यावे, मानधनात दिरंगाई न करता उ्इढ द्वारे नियमित खात्यात दरमहा मानधन आदा करावे. ग्राम सखींना १०,०००००/- विमा कवच देऊन मरण पावलेल्या ग्रामसखींना ते तात्काळ देण्यात यावे, ग्रामसखींना कायम स्वरुपी प्रवास भत्ता व आहार भत्ता देण्यात यावा, उमेद अभियानाचे कामे ही डिजिटल व ऑनलाईन असल्याने अभियानांतर्गत सर्व ग्रामसखी यांना डिजिटल टॅब (दर्जेदार) कंपनीचा उपलब्ध करुन देणे व दरमहा मोबाइल डेटा भत्ता देणे आधी मागण्यांचे निवेदन आज पंचायत समिती कार्यालयात जाऊन सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांच्याकडे सादर केले. यावेळी मीरा जिवराज सातभाई, वंदना प्रभाकर उजगरे, इंदुमती वामन कांदे, शितल शिवाजी कोकाटे, वर्षा सुरेश खराटे आदींसह बहुसंख्य ग्राम सखी आणि संघ केडर सहभागी झाले होते.

# पाटोदा तालुक्यातील नाळवंडी घटनेने तालुका सुन्न

### चिमुकलीवर ओढवलेल्या प्रसंगात रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानचा मोठा आधार

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील नाळवंडी येथे एका अवघ्या आठ वर्षांच्या निष्पाप चिमुकलीवर घडलेल्या दुर्दैवी आणि अतिशय संतापजनक घटनेने संपूर्ण तालुका सुन्न झाला आहे. ६२ वर्षांच्या नराधमाने या निष्पाप बालिकेवर केलेल्या पाशवी कृत्यामुळे सर्वत्र तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाला सुरुवातीला वाचा फोडण्याचे आणि त्या चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी सर्वप्रथम आवाज उठवण्याचे धाडसी कार्य सामाजिक कार्यकर्ते विजयसिंह (बाळा) बांगर यांनी केले.



घटनेचे गांभीर्य ओळखून केवळ आवाज उठवून न थांबता, रामकृष्ण बांगर प्रतिष्ठानच्या वतीने पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत सुपूर्द करत मोठा आधार दिला आहे. याहीपुढे जात विजयसिंह (बाळा) बांगर यांनी माणुसकीचे एक श्रेष्ठ उदाहरण वस्तुपाठाच्या रूपाने घालून दिले आहे; त्यांनी त्या पीडित लहानग्या मुलीच्या संपूर्ण भविष्याची जबाबदारी घेत तिचे 'पालकत्व' स्वीकारले आहे. या अभागी बालिकेच्या आयुष्याला सुरक्षितता आणि मायेचे छत्र देण्याचे वचन त्यांनी दिले आहे.समाजाला आवाहन: केवळ सहानुभूती नको, भक्कम आधाराची गरज!या कठीण प्रसंगात पीडित कुटुंबावर आभाळ कोसळले आहे. आज या कुटुंबाला केवळ शब्दांच्या सांत्वनाची किंवा आस्वासनांची नाही, तर आपल्या सगळ्यांच्या भक्कम आधाराची खरी गरज आहे. या भीषण संकटात त्या चिमुकलीच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येऊन या कुटुंबाला धीर द्यावा, माणुसकीचा हात पुढे करावा आणि अशा प्रवृत्तींविरोधात एकजुटीने लढा द्यावा, असे नम्र आवाहन रामकृष्ण बांगर प्रतिष्ठान व नागरीकांच्या वतीने करण्यात येत आहे.

# कृष्ण म्हणजे भेदांच्या भिंती पाडणारे परमतत्त्व- भागवताचार्य भंडारे

माजलगाव। प्रतिनिधी

श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त श्रीमंगलनाथ मंदिर, बायपास रोड, माजलगाव येथे शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी रात्री १० ते १२ या वेळेत भक्तिरसपूर्ण कीर्तन सोहळा उत्साहात संपन्न झाला. कृष्ण गोकुळी जन्मला । दुष्टांचा काळ सुटला या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर भागवताचार्या कुलस्वामिनी दीदी यांनी प्रभावी निरूपण करून उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले.कृष्ण म्हणजे केवळ बासरी, राधा किंवा कुरुक्षेत्र नव्हे!श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे विश्लेषण करताना कुलस्वामिनी दीदी म्हणाल्या, कृष्ण म्हणजे केवळ बासरी नव्हे, कृष्ण म्हणजे केवळ राधा नव्हे, कृष्ण म्हणजे केवळ कुरुक्षेत्र नव्हे; तर कृष्ण म्हणजे माणसामाणसांमधील भेदांच्या भिंती पाडून हृदयांना जोडणारे परमतत्त्व होय.



राजकुमार असूनही श्रीकृष्ण गोकुळातील सामान्य बालकांबरोबर खेळले. त्यांच्या जीवनातील कृष्ण-सुदामा मैत्रीचा दाखला देत त्यांनी श्रीमंती-गरिबीच्या भिंती कृष्णाने आपल्या प्रेमाने दूर केल्या, असे सांगितले.

महाभारतातील कृष्ण-विदुर भेटीचा प्रसंग विशद करताना त्या म्हणाल्या की, दुर्योधनाच्या राजेशाही मेजवानीपेक्षा श्रीकृष्णांनी विदुर काकांच्या घरी प्रेमाने मिळणाऱ्या साध्या भोजनाला प्राधान्य दिले. यातून श्रीकृष्णाला संपत्तीपेक्षा प्रेम आणि माणुसकी अधिक प्रिय होती, हा संदेश मिळतो.कुब्जेचा स्वीकार म्हणजे सामाजिक समरसतेचा आदर्शकुब्जेच्या प्रसंगाचे मार्मिक विवेचन करताना कुलस्वामिनी दीदी म्हणाल्या, शारीरिकदृष्ट्या विकृत असलेल्या कुब्जेकडे समाज कदाचित वेगळ्या नजरेने पाहत असेल; मात्र श्रीकृष्णांनी तिचा तिरस्कार केला नाही. रंग, रूप, जात, भाषा, शिक्षण किंवा सामाजिक प्रतिष्ठा यांचा विचार न करता तिचा माणूस म्हणून स्वीकार केला. हाच सामाजिक समरसतेचा खरा आदर्श आहे.

त्या पुढे म्हणाल्या, माणसाची किंमत त्याच्या जन्माने नव्हे, तर त्याच्या गुणांनी, प्रेमाने आणि आचरणाने ठरते. श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग हा समाजाला प्रेम, बंधुभाव, समता आणि मानवतेचा संदेश देणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगताया कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानेश्वर माऊली जाधव, उपनगराध्यक्ष तथा श्रीमंगलनाथ मंदिराचे वर्तमान अध्यक्ष, आणि सौ. यशोदाताई जाधव यांनी केले.कीर्तनास ह.भ.प. आदिनाथ शास्त्री कुंडकर यांनी गायनाची साथ दिली. गायनाचार्य ह.भ.प. सुभाष म. होगे, ऋषी म. सावंगीकर तसेच मृदंगाचार्य ह.भ.प. विठ्ठल म. अंबुरे यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त झालेल्या या कार्यक्रमास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संपूर्ण मंदिर परिसर जय जय रामकृष्ण हरी च्या जयघोषाने दुमदुमून गेला. भक्ती, ज्ञान आणि सामाजिक समरसतेचा संदेश देणाऱ्या या कीर्तनाने उपस्थित भाविकांना आध्यात्मिक आनंदासोबतच सामाजिक बांधिलकीची प्रेरणाही दिली.

# पाटोदा तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा!: राहुल जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट उभे राहिले आहे. तालुक्यातील सुमारे ५० हजार हेक्टरवरील सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला असून, सोयाबीनवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे पाटोदा तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस तालुकाध्यक्ष राहुल जाधव यांनी केली आहे.यंदा पावसाने सुरुवातीला काही प्रमाणात साथ दिल्यानंतर ऐन पिकाच्या वाढीच्या काळात दीर्घ खंड पडला. त्यामुळे सोयाबीनसह उडीद, मूग, तूर, कापूस, मका, बाजरी आणि भुईमूग यांसारखी पिकेही पाण्याअभावी वाळू लागली आहेत. डोळ्यादेखत करपणारी पिके पाहून शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे.



गेल्या काही दिवसांपासून आकाशात ढग दाटून येत असले तरी अपेक्षित पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अधूनमधून पडणाऱ्या रिमझिम सरींनी पिकांना दिलासा मिळण्याऐवजी शेतकऱ्यांच्या अपेक्षा आणखी वाढत आहेत. पाऊस न झाल्यास उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून, खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी अधिक तीव्र करणारा ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. पावसाच्या दीर्घ खंडाचा परिणाम तालुक्यातील जलसाठ्यांवरही झाला आहे. अनेक तलाव मृतसाठ्यात गेले असून, नदी-नाले कोरडे पडले आहेत. आगामी काळात समाधानकारक पाऊस झाला नाही तर पशुधनासाठी पाणी आणि चारा उपलब्ध करून देण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहणार आहे.शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी केलेली पिके आता हातातून निसटत असल्याने कर्ज, बियाणे, खत आणि मशागतीवर झालेला खर्च कसा भरून काढायचा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. निसर्गाने साथ सोडल्यानंतर आता प्रशासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी होत आहे. करपलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसानीचा तातडीने अहवाल तयार करावा आणि शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

तसेच पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची गांभीर्याने दखल घेऊन विमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. पाटोदा तालुक्यातील सद्यस्थिती लक्षात घेता शासनाने विलंब न करता दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी करून तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी राहुल जाधव यांनी केली आहे.

# बांधकाम विभाग झोपेत; खड्ड्यांनी पात्रुड-जीवनापूर मार्गाची चाळण!

माजलगाव। प्रतिनिधी

बीड-पिंपळनेर- पात्रुड-जीवनापूर मार्गाची अक्षरशः चाळण झाली असून मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबर आणि धोकादायक साईड पट्ट्यांमुळे हा रस्ता आता मृत्यूचा सापळा बनला आहे. पावसाळ्यात रस्त्याच्या कडेला चिखल आणि खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने दररोज शाळा-कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अनेक ठिकाणी तब्बल एक फुटापर्यंत उंचीचा फरक निर्माण झाला आहे. वाहन किंचित जरी कडेला गेले तरी पलटी होण्याचा धोका आहे. डांबर उखडल्याने रस्त्यावर खडी-माती पसरली असून दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अक्षरशः जीवघेणा ठरत आहे. या धोकादायक परिस्थितीबाबत सत्यप्रेम कोरडे, चिंतामणी कोळसे , हनुमान कोरडे, रंगनाथ सागर व रोहन डोके यांनी १० जुलै २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना लेखी निवेदन दिले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे साईड पट्टे तातडीने भरून रस्ता सुरक्षित करण्याची मागणी करण्यात आली.

मात्र निवेदन देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. एखाद्याचा जीव गेल्यानंतरच बांधकाम विभाग जागा होणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. हा मार्ग अनेक गावांना जोडणारा असून विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार तसेच रुग्णांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. त्यामुळे रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून साईड पट्टे भरले नाहीत, तर मोठा अपघात घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागाची राहील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. आता आश्वासन नको, प्रत्यक्ष काम हवे! प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

# शालेय क्रीडा स्पर्धांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्याचा आरोप!

### संस्कार शाळेतील शिक्षकाच्या कथित वर्तनामुळे खेळाडूंमध्ये नाराजी

बीड । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा जिल्हा क्रीडा कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी विविध शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी शाळांनी जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या संबंधित ऑनलाइन प्रणालीवर विद्यार्थ्यांचे ऑनलाइन रजिस्ट्रेशन करणे आवश्यक असते. या संपूर्ण प्रक्रियेची जबाबदारी संबंधित शाळा व तेथील क्रीडा शिक्षकांची असते.विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी, स्पर्धांमध्ये सहभाग तसेच क्रीडा नियमांची माहिती देण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने क्रीडा शिक्षकांना ऑनलाइन प्रक्रिया समजावून सांगण्यात येते. त्यासाठी प्रशिक्षणही दिले जाते. प्रशिक्षण घेतल्यानंतर संबंधित क्रीडा शिक्षकांनी आपल्या शाळेतील पात्र खेळाडूंची ऑनलाइन नोंदणी करून त्यांना स्पर्धांमध्ये सहभागी करून घेणे अपेक्षित आहे.



मात्र, बीड शहरातील संस्कार शाळेत कार्यरत असलेल्या भोसले नामक शिक्षकाकडून विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रापासून जाणीवपूर्वक दूर ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. संबंधित शिक्षक विद्यार्थ्यांना खेळापासून परावृत्त करतात, खेळाडूंना कथितरीत्या खडसावतात तसेच काही विद्यार्थ्यांचा अपमान केला जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे शाळेतील अनेक विद्यार्थी क्रीडा क्षेत्रापासून दूर जात असल्याची चर्चा आहे.खेळाडूंना प्रोत्साहन देणे, त्यांच्या अंगभूत क्रीडा गुणांना वाव देणे आणि जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय स्पर्धांसाठी त्यांना तयार करणे ही क्रीडा शिक्षकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी त्यांच्यात भीती अथवा न्यूनगंड निर्माण होत असेल, तर त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या क्रीडा भवितव्यावर होऊ शकतो.एकीकडे शासनाकडून 'खेळा आणि जिंका' तसेच विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे आणण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असताना, दुसरीकडे शाळेतीलच एखाद्या शिक्षकाच्या कथित वर्तनामुळे विद्यार्थी खेळापासून दूर जात असतील तर हा गंभीर विषय आहे. त्यामुळे जिल्हा क्रीडा कार्यालयाने तसेच शिक्षण विभागाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी मागणी पालक व क्रीडाप्रेमींकडून होत आहे.

चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी

विद्यार्थ्यांच्या क्रीडा सहभागास अडथळा निर्माण करणारे कोणतेही प्रकार घडत असल्यास त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे म्हणणे, पालकांची भूमिका तसेच शाळेतील क्रीडा नोंदणी व स्पर्धेतील सहभागाची माहिती तपासून सत्य परिस्थिती समोर आणावी.

दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी होत आहे.या आरोपांबाबत संस्कार शाळेतील संबंधित शिक्षक व शाळा प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नसून, त्यांची बाजू उपलब्ध झाल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येईल.

# गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे भव्य राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन

### डी. फार्मसी व बी. फार्मसी विद्यार्थ्यांना सहभागाचे आवाहन नावनोंदणी सुरू

माजलगाव। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि सादरीकरण कौशल्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने गुरुकृपा इन्स्टिटच्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव यांच्या वतीने राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १२ सप्टेंबर २०२६ रोजी, गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे होणार असून महाराष्ट्रातील डी. फार्मसी व बी. फार्मसी विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी देण्यात आली आहे असे प्रतिदान प्रोग्राम कॉर्डिनेटर प्रा. डॉ. निखिल जाधव आणि प्रा. राहुल वांडरे यांनी केले आहे. तसेच सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत असे जाहीर केले आहे.

फार्मसी अभ्यासक्रमावर आधारित फार्मास्युटिक्स, फार्माकोलॉजी, फार्माकॉग्नोसी, फार्मास्युटिकल नालिसिस, फार्मास्युटिकल केमिस्ट्री, हॉस्पिटल फार्मसी आणि एआय इन फार्मसी या विषयांवर विद्यार्थ्यांना पोस्टर सादर करता येणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना व संशोधनात्मक विचार प्रभावीपणे मांडावेत, असा उद्देश या स्पर्धेचा आहे.बी. फार्मसी गटासाठी प्रथम ७,०००/ रुपये, द्वितीय ५,०००/ रुपये आणि तृतीय ३,०००/ रुपये तर डी. फार्मसी गटासाठी प्रथम ५,०००/ रूपये, द्वितीय ३,०००/ रुपये आणि तृतीय २,००० रुपये असा रोख धनादेश, सन्मानचिन्ह बक्षीस अशी आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. डी. फार्मसी व बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या राज्यस्तरीय व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले आणि फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अमित बिंदू यांनी केले आहे.

# एल निनोचा प्रभाव होणार अधिक तीव्र; पाऊस, तापमान आणि शेतीवर परिणाम

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

विषुववृत्तीय प्रशांत महासागरात सध्या सक्रिय असलेली एल निनो स्थिती पुढील काही महिन्यांत अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, तिचा प्रभाव फेब्रुवारी २०२७ पर्यंत कायम राहू शकतो, असा इशारा जागतिक हवामान संघटनेने दिला आहे. यामुळे जगभरातील पर्जन्यमान, तापमान आणि पूर-दुष्काळासारख्या हवामानाशी संबंधित संकटांमध्ये वाढ होऊ शकते.

भारतासाठीही हा इशारा महत्त्वाचा मानला जात आहे. एल निनो हा एल निनो-दक्षिणी दोलन या जागतिक हवामान चक्राचा एक टप्पा आहे. प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान नेहमीपेक्षा वाढते तेव्हा एल निनोची स्थिती निर्माण होते. जागतिक हवामान संघटनेच्या महासंचालक सेलेस्टे साउलो यांनी म्हटले आहे की, अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि समाजव्यवस्थेवरही एल निनो मोठा परिणाम करू शकतो.



एल निनो अधिक तीव्र झाल्यास, काही भागांत दुष्काळ बाहू शकतो, काही भागांत अतिवृष्टी आणि पूरस्थिती निर्माण होऊ शकते, उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होऊ शकतात, कृषी उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. भारतीय हवामान विभागाने सप्टेंबरमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. सप्टेंबरमधील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या २१ टक्क्यांपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. भारतात एल निनोचा सर्वाधिक परिणाम मान्सूनवर दिसून येतो. भारतीय हवामान विभागाने स्पष्ट केले की, ऑगस्ट महिन्यात देशभरात पावसाची १६ टक्के तूट नोंदली गेली. यामागील प्रमुख कारणांपैकी एक एल निनो होते. त्याचबरोबर ऑगस्ट २०२६ हा १९०१ नंतरचा सर्वाधिक उष्ण ऑगस्ट ठरल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. एल निनो तीव्र झाल्यास भारतातील हिवाळी तापमानातही वाढ होऊ शकते. भारतात आधीच हिवाळा तुलनेने उष्ण होत असल्याची नोंद विविध अभ्यासांत झाली आहे. दिल्लीस्थित क्लायमेट ट्रेंड्स या संस्थेच्या अलीकडील अभ्यासानुसार उत्तर भारतातील हिवाळ्याचा कालावधी कमी होत आहे. विशेषतः फेब्रुवारी आणि मार्च महिन्यांत तापमान वाढण्याचा वेग अधिक दिसून येत आहे.

**तापमानवाढीचे चित्र :**

महिना - दशकाला तापमानवाढ
फेब्रुवारी - ०.६९ अंश सेल्सिअस
मार्च - ०.५८ अंश सेल्सिअस
एप्रिल - ०.६६ अंश सेल्सिअस

**शेतीसमोर कोणते आव्हान?**

फेब्रुवारी-मार्चमधील तापमानवाढीचा सर्वाधिक फटका रब्बी पिकांना बसू शकतो. विशेषतः गहू पिकाच्या फुलोरा अवस्थेत, दाणे भरण्याच्या टप्प्यात अधिक उष्णता निर्माण झाल्यास उत्पादन घटण्याचा धोका वाढतो. देशातील प्रमुख गहू उत्पादक पट्ट्यांमध्ये या बदलांचा परिणाम आधीच दिसू लागला आहे.

## ब्लॅक बेंगाल शेळी मांस उत्पादनासाठी प्रसिद्ध; वाचा या जातीची वैशिष्ट्ये ?



शेळीपालन व्यवसाय हा भारतामध्ये शेतीला जोडधंदा म्हणून करण्यात येणारा दुग्धव्यवसायानंतर दुसऱ्या क्रमांकाचा महत्वाचा व्यवसाय आहे. या व्यवसायाचे काही सकारात्मक पैलू पाहिले तर यात लागणारी जागा ही कमी लागते. तसेच पशुपालनाच्या दृष्टिकोनातून खर्च देखील खूप कमी लागतो. त्यामुळे कमी खर्चात चांगला नफा देण्याची क्षमता शेळीपालन व्यवसायात आहे.

शेळीपालनाकडे अनेकांचा ओढा :परिणामी, शेळीपालन व्यवसायाकडे आता तरुण सुशिक्षित बेरोजगार देखील मोठ्या प्रमाणावर वळले असून, काही तरुणांनी करिअर म्हणून शेळी पालन व्यवसायाची निवड केलेली दिसते. परंतु, शेळीपालन व्यवसाय यशस्वी करायचा असेल तर त्याकरिता शेळ्यांच्या दर्जेदार आणि जातिवंत जातींची निवड करणे तितकेच महत्त्वाचे असते. भारतामध्ये शेळयांच्या अनेकविध जाती आहेत. परंतु त्यातील उत्तम जातींची निवड ही खूप महत्त्वाचे ठरते. याच अनुषंगाने आज आपण शेळीच्या 'ब्लॅक बेंगाल शेळी' या महत्त्वपूर्ण जातीविषयी माहिती घेणार आहोत.ब्लॅक बेंगाल शेळीची शरीर रचना :ब्लॅक बेंगाल या जातीची शेळी, शेळी पालनासाठी खूप फायद्याची आहे. ही शेळी आकाराने लहान असते व भारताच्या पूर्वेकडील भागामध्ये आढळून येते. या जातीच्या शेळीची शरीर रचना पाहिली तर तिचे पाय लहान आणि चेहरा गोल असतो व त्यासोबतच नाकाची रेषा सरळ असून ती दाबली गेलेली असते. याशिवाय या शेळीचे सगळ्यात वेगळे वैशिष्ट्य म्हणजे ही कोणत्याही हवामानात तग धरून राहते. त्यामुळे हवामान बदलाचा तितकासा परिणाम या शेळीवर होत नाही.

कसा होतो आर्थिक फायदा?

ब्लॅक बेंगाल शेळी ही मांस उत्पादनासाठी खूप महत्त्वाची असून, एका शेळी पासून १८ ते २० किलोपर्यंत मांस उत्पादन मिळू शकते. साधारणपणे आठ ते दहा महिन्यात या जातीची शेळी प्रौढ होते. ब्लॅक बेंगाल शेळी ही दूध उत्पादनासाठी देखील महत्त्वाचे असून, खूप चांगल्या दर्जाचे दूध या जातीच्या शेळीपासून मिळते. जवळजवळ तीन ते चार महिन्यांपर्यंत ही शेळी दूध देते. तसेच दररोज अर्धा लिटरपर्यंत एक शेळी दूध देऊ शकते. दरम्यान, ब्लॅक बेंगाल शेळीच्या गर्भधारणेचा कालावधी पाहिला तर तो सर्वसाधारणपणे बारा महिन्यानंतरचा असतो. तिचे ऋतुचक्र हे १८ ते २० दिवसांच्या असते. यामध्ये या जातीच्या शेळीला गर्भधारणा होत असते. मांस उत्पादनासाठी ही शेळी प्रसिद्ध असून, एका वर्षामध्ये तीन पिल्लांना जन्म देण्याची क्षमता या जातीच्या शेळीमध्ये आहे.

## असे करा कापूस पिकातील रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण!

कापूस पिकावर मावा, तुडतुडे, फुलकिडी, पिठ्या ढेकूण यासारख्या रस शोषणाऱ्या किडींचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊ शकतो.

यांत्रिक पद्धत :शेताचे नियमित निरीक्षण करावे. रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झालेली गळालेली पाते आणि बोंडे जमा करून नष्ट करावीत. शेताची कोळपणी व खुरपणी किंवा रासायनिक तणनाशकाचा वापर करून पिकाच्या सुरुवातीची ८ ते ९ आठवडे तणांचे व्यवस्थापन करावे. पीक २० दिवसाचे झाल्यावर शेतात पिवळे निळे चिकट सापळे लावावेत. एक हेक्टरसाठी १५ पिवळे व ५ निळे सापळे लावावे.

मशागतीय पद्धती :नत्र खताचा अतिरिक्त वापर टाळावा. शिफारशीनुसार दोन ओळीतील व दोन रोपांतील अंतर ठेवावे. मित्र कीटकांचे संवर्धन होण्यासाठी मका, चवळी, उडीद, मूग यासारखी आंतरपिके, मिश्र पिके घ्यावीत. कपाशी पिकाभोवती झेंडू आणि एरंडी या सापळा पिकांची एक ओळ कडेने लावावी.

जैविक पद्धती :ढाल किडा म्हणजेच लेडीबर्ड बीटल या कीटकाचे प्रौढ व त्यांच्या अळ्या प्रामुख्याने मावा किडीवर जगतात. लेडी बर्ड बीटल पुरेशा प्रमाणात आढळून आल्यास रासायनिक कीडनाशकांचा वापर टाळावा. सिरफीड माशी, पेंन्टाटोमीड ढेकूण, कातीन, भुंगे, ड्रॅगनफ्लाय, रॉबर माशी, गांधील माशी, प्रार्थना कीटक, टॅकनिड माशी इ. मित्र किटकांचे संवर्धन करावे. ५% निंबोळी अर्काची किंवा ॲझाडिरेक्टीन दहा हजार पीपीएम १० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिठ्या ढेकणासाठी व्हर्टिसिलीयम बुरशीची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

रासायनिक नियंत्रण पद्धती :

निंबोळी तेल (५%) ५० मिली किंवा फ्लोनीकॅमीड (५०) २ ग्रॅम किंवा डायफेन्थुरॉन (५० ) १२ ग्रॅम किंवा फिप्रोनील ५ एस सी ३० मिली किंवा पायरीप्रोक्झीफेन (५%) + डायफेन्थुरॉन (२५% ) २० मिली. वरीलपैकी कोणत्याही किडनाशकांची दिलेल्या प्रमाणात प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.



## गुलाब शेती, अत्यंत फायदेशीर आणि बारमाही उत्पन्न देणारा व्यवसाय

गुलाब शेती हा एक अत्यंत फायदेशीर आणि बारमाही उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. लग्नसराई,सण-उत्सव आणि विविध कार्यक्रमांमध्ये गुलाबाच्या फुलांना वर्षभर प्रचंड मागणी असते. गुलाब शेती यशस्वी करण्यासाठी खालील प्रमुख बाबींची माहिती असणे आवश्यक आहे:

हवामान आणि जमीन :गुलाबाच्या उत्तम वाढीसाठी १५ ते २८ तापमान आदर्श मानले जाते. कडक ऊन आणि अति थंडी या दोन्ही गोष्टी पिकासाठी नुकसानकारक ठरू शकतात. पाण्याचा उत्तम निचरा होणारी, कसदार आणि मध्यम ते भारी जमीन (उदा. काळसर किंवा लोम माती) गुलाबासाठी योग्य असते. जमिनीचा सामू () ६.० ते ७.५ च्या दरम्यान असावा.

गुलाबाच्या प्रमुख जाती :व्यापारी दृष्टिकोनातून गुलाबाचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. कट फ्लॉवर्स (लांब दांड्याची फुले): पॉलिहाउसमध्ये शेती करण्यासाठी या जाती वापरतात. (उदा. सिक्रेट, डच गुलाब, फर्स्ट रेड, गोल्डन गेट). लूज फ्लॉवर्स (सुटी फुले): उघड्या शेतातील लागवडीसाठी, हार किंवा पूजेच्या साहित्यासाठी या जाती वापरतात. (उदा. गावरान गुलाब, ग्लॅडिएटर, सोफिया).



पूर्वमशागत आणि लागवड :जमीन उभी-आडवी नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी. त्यात भरपूर प्रमाणात चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत मिसळावे. गुलाबाची लागवड कलमे वापरून केली जाते. उघड्या शेतात लागवड करताना ३ ३ फूट किंवा ३ २ फूट अंतरावर ३० ३० सेमी आकाराचे खड्डे घेऊन लागवड करावी.

खत आणि पाणी व्यवस्थापन : गुलाबाच्या झाडांना नियमित पण बेताचे पाणी द्यावे लागते. पाणी साचून राहिल्यास मुळे सडतात, त्यामुळे ठिबक सिंचन पद्धत वापरणे अत्यंत फायदेशीर ठरते. झाडांची चांगली वाढ आणि भरपूर फुलांसाठी नत्र, स्फुरद आणि पालाश या रासायनिक खतांसोबतच निंबोळी पेंड आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा.

छाटणी आणि महत्त्वाच्या आंतरमशागती :वर्षातून एकदा (सामान्यतः ऑक्टोबरच्या दरम्यान) झाडांची छाटणी करणे गरजेचे असते. यामुळे जुन्या, रोगट फांद्या निघून जातात आणि नवीन जोमदार फुटवे येतात, ज्यावर भरपूर फुले लागतात. झाडाच्या मूळ खोडावरून निघणारे रानटी कोंब नियमितपणे तोडून टाकावे लागतात, अन्यथा ते मुख्य झाडाचे पोषण शोषून घेतात.

रोग आणि कीड नियंत्रण :प्रामुख्याने फुलकिडे, कोळी आणि मावा यांचा प्रादुर्भाव होतो. यासाठी योग्य कीटकनाशकांची फवारणी करावी. भुरी आणि काळे ठिपके हे मुख्य रोग आहे. हवामान बदलल्यास बुरशीनाशकांचा वापर करावा.

काढणी आणि उत्पादन : लागवडीनंतर साधारण ४ ते ५ महिन्यांत फुले येण्यास सुरुवात होते. कट फ्लॉवर्ससाठी फूल कळी अवस्थेत असताना, तर सुट्या फुलांसाठी फूल पूर्ण उमलण्यापूर्वी पहाटे किंवा संध्याकाळी काढावे. एका एकरातून योग्य व्यवस्थापन केल्यास लाखो फुलांचे उत्पादन मिळते, ज्यातून वर्षाकाठी चांगला नफा कमावता येतो. जर तुम्हाला मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक शेती करायची असेल, तर पॉलिहाऊस किंवा ग्रीनहाऊस पद्धतीचा अवलंब करावा. यासाठी सरकारकडून (राष्ट्रीय फलोत्पादन अभियान - अंतर्गत) ५०% पर्यंत अनुदान देखील मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८१ : मैसूर शासक हैदर अली यांनी ब्रिटीश सरकारच्या इस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याशी पोल्लीलूर ची लढाई लढली.
१९३९ : सर फ्रँक व्हीटल आणि हॅन्स ओहायन यांनी शोध लावलेल्या क्शळपञ्जशश्र क्श १७८ या जगातील पहिल्या टर्बो जेट विमानाचे उड्डाण झाले.
१९५७ : मलेशियाची राज्यघटना अमलात आली.
१९६२ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने शुक्र ग्रहाची तपासणी करण्यासाठी चरीळपशी २ हे यान प्रक्षेपित केले.
१९६६ : वसंत कानेटकर लिखित पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शित अश्रूंची झाली फुले या नाटकाचा मुंबईत पहिला प्रयोग.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायदा संमत.
१९९१ : मोल्डोव्हाने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले. १९६६ : नाट्यसंपदा निर्मित, वसंत कानेटकर लिखित व पुरुषोत्तम दारव्हेकर दिग्दर्शित 'अश्रूंची झाली फुले' या नाटकाचा पहिला प्रयोग गिरगाव येथील साहित्य संघ मंदिर येथे झाला.
१९९१ : युरोपिअन महासंघाने इस्टोनिया, लाटव्हिया व लिथुआनियाच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली.
१९९९ : कारगिल संघर्षाच्या वेळी भारताने बंदी घातलेल्या पाकिस्तानी कैद्यांना सोडून दिल.
१९९९ : सोनाली बॅनर्जी या आपली चार वर्षांची मेहनत पूर्ण करून देशातील पहिल्या सागरी अभियंता बनल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५४ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे - प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वऱ्हाडचे नबाब' (मृत्यू: १ जुलै १९३८)
१८५९ : सर दोराबजी टाटा - उद्योगपती व लोकहितबुद्धी (मृत्यू: ३ जून १९३२)
१८७७ : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रॉल्स यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १९१०)
१९०८ : सर डोनाल्ड ब्रॅडमन - ऑस्ट्रेलियन फलंदाज, संघनायक व विक्रमवीर. १९४९ मध्ये त्यांना 'सर' हा किताब देण्यात आला. (मृत्यू: २५ फेब्रुवारी २००१)
१९०८ : लिंडन बी. जॉन्सन - अमेरिकेचे ३६ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २२ जानेवारी १९७३)
१९१० : सेतू माधवराव पगडी - इतिहासकार, विचारवंत, संशोधक, लेखक, वक्ते, तत्त्वचिंतक, समीक्षक, इतिहासाचे भाष्यकार, कार्यक्षम मुलकी अधिकारी, प्रशासक, 'गॅझेटियर्स'चे संपादक असे विविधांगी पैलू असलेले व्यक्तिमत्त्व. गोंडी व कलामी या आदिवासींच्या बोलिंवर त्यांनी लिखाण केले. 'जीवनसेतू' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: १४ आक्टोबर १९९४)
१९१६ : रेंज रोव्हर चे सहरचनाकार गॉर्डन बाशफोर्ड यांचा जन्म. (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९१)
१९१९ : वि. रा. करंदीकर - प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी लेखक, संतसाहित्याचे अभ्यासक तसचं, राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व मराठी ज्ञानकोशाचे संपादन करणारे (मृत्यू: १५ एप्रिल २०१३)
१९२५ : नारायण धारप - भारतीय महाराष्ट्रीयन मराठी रहस्यकथाकार व लेखक आणि नाटककार (मृत्यू: १८ ऑगस्ट २००८)
१९२५ : भारतीय कवीजसवंत सिंग नेकी यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर २०१५)
१९३१ : भारतीय अध्यात्मिक गुरु चिन्मोय कुमार घोस उर्फ श्री चिन्मोय यांचा जन्म. (मृत्यू: ११ ऑक्टोबर २००७)
१९७२ : मल्ल दिलीपसिंग राणा ऊर्फ ग्रेट खली यांचा जन्म. - भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू(रेसलर) द ग्रेट खली या रिंग नावाने परिचित
१९८० : भारतीय अभिनेत्री नेहा धुपिया यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७५ : बँक ऑफ कॅलिफोर्निया चे संस्थापक विलियम चॅपमन राल्स्टन यांचे निधन. (जन्म: १२ जानेवारी १८२६)
१९५५ : जगन्नाथ रघुनाथ आजगावकर - संतचरित्रकार, १९०७ ते १९३५ या काळात त्यांच्या 'महाराष्ट्र कविचरित्र' या ग्रंथाचे नऊ खंड प्रकाशित झाले होते. (जन्म: १६ ऑगस्ट १८७९)
१९७६ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' - पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (जन्म: २२ जुलै १९२३)
१९७९ : लॉर्ड लुई माउंटबॅटन - भारताचे शेवटचे व्हॉईसरॉय आणि स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल (जन्म: २५ जून १९००). ब्रिटीश कालीन भारतातील शेवटचे व्हॉईसरॉय व स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल तसचं, भारत देशाची फाळणी करून नवीन पाकिस्तान देशाची निर्मिती करणारे ब्रिटीश अधिकारी
१९९५ : मधू मेहता - हिन्दुस्तान आंदोलनाच्या माध्यमातून भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देणारे सामाजिक कार्यकर्ते (जन्म:)
२००० : मनोरमा वागळे - रंगभूमी, चित्रपट व मालिकांमध्ये विविध भूमिका केलेक्या अभिनेत्री (जन्म: ? ? १९२८)
२००६ : हृषिकेश मुकर्जी - चित्रपट दिग्दर्शक (जन्म: ३० सप्टेंबर १९२२)

# श्रावण मास भोजन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

## उदगीर भावसार क्षत्रिय समाजाचा आदर्शवत उपक्रम; एकता, शिक्षण, संस्कार व सामाजिक बांधिलकीचा दिला संदेश

उदगीर। प्रतिनिधी

उदगीर भावसार क्षत्रिय समाजाच्या वतीने श्रावण मासानिमित्त सामूहिक भोजन तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदी व आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास अखिल भारतीय भावसार महासभा महाराष्ट्र राज्य महिला प्रदेशाध्यक्ष सौ. कोमलताई वायचळकर, डॉ. वर्षा महिंद्रकर, धनंजय तांदळे व सुनील अभंगे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उदगीर भावसार क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष श्री. गिरीश गर्जे यांनी केले. तरुण, उत्साही आणि सर्वांना सोबत घेऊन समाजहितासाठी कार्य करणारे नेतृत्व म्हणून त्यांच्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले.




यावेळी प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित समाजबांधवांना समाजाची आवश्यकता, सामाजिक एकता, संघटन, शिस्त, शिक्षण आणि तरुणांची सामाजिक जबाबदारी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या काळानुसार समाजाने आधुनिक विकासाची कास धरून शिक्षणासोबतच समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.उदगीर भावसार क्षत्रिय समाजाने विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून एकता, प्रेम, आपुलकी, नियम, अनुशासन आणि परस्पर सहकार्याची भावना जपली आहे. सर्व समाजबांधवांना सोबत घेऊन सामूहिकपणे कार्य करण्याची येथील पद्धत कौतुकास्पद असून, उदगीर भावसार क्षत्रिय समाज हा सामाजिक एकता व संघटनाचा आदर्श निर्माण करणारा समाज आहे, असे गौरवोद्गार यावेळी व्यक्त करण्यात आले. येथील समाजबांधवांमधील प्रेम, शिस्त, आपलेपणा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची सकारात्मक भावना इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याचेही प्रमुख पाहुण्यांनी नमूद केले.कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर भविष्यातही उत्तुंग यश संपादन करून आपल्या कुटुंबासह समाजाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम केवळ श्रावण मास भोजन व सत्कार सोहळा न राहता समाजातील एकता, शिक्षण, संस्कार, संघटन आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.श्रावण मासानिमित्त आयोजित सामूहिक भोजनाचा समाजबांधवांनी मोठ्या उत्साहाने आनंद घेतला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजातील बंधुभाव, एकोपा आणि सामाजिक एकतेचे सुंदर दर्शन घडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधवांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले आणि त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित समाजाचे अध्यक्ष श्री.गिरीश गर्जे सचिव श्री. रितेश बेद्रे,उपाध्यक्ष श्री गुरुदत्त महिंद्रकर व श्री अशोक बुलबुले , श्री भूषण बुलबुले,कोषाध्यक्ष श्री श्याम ढगे,श्री किरण गर्जे,श्री गणेश बेद्रे,श्री बालाजी ढगे ,श्री जयदेव महिंद्रकर,श्री कृष्ण खमीतकर सर,श्री शशिकांत बुलबुले, श्री श्रीकृष्ण बेद्रे, श्री सुधीर महिंद्रकर, श्री संतोष गर्जे,श्री बंडू महिंद्रकर, श्री जयदेव महिंद्रकर,श्री बालाजी ढगे,श्री शंकर महिंद्रकर, श्री राजू महिंद्रकर, श्री सतीश बेद्रे, श्री सुनील अपसिंगेकर सर,श्री गणेश कालेकर ,श्री वेधभूषण कालेकर ,श्री तुषार बुलबुले, श्री कपिल वायचळकर, श्री चंद्रशेखर बेद्रे, श्री परिमल बेद्रे, स्वरूप महिंद्रकर, श्री अशोक बुलबुले, श्री प्रवीण बेद्रे या सर्व कार्यकर्त्यांनी या कार्यक्रम यशस्वीतेसाठी मेहनत घेतली. सर्वांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम केवळ श्रावण मास भोजन व सत्कार सोहळा न राहता समाजातील एकता शिक्षण संस्कार संघटन आणि सामाजिक बांधिलकी अधिक द्रड करणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.उदगीर भावसार क्षत्रिय समाजाच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, गुणवंत विद्यार्थी, पालक व समाजबांधवांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# गुणवान आणि विद्वान होण्यासाठी आयुष्य वेचा–प्रा. डॉ. शंकर विभूते



जळकोट। प्रतिनिधी

कुसुमाग्रज यांची कविता प्रेम कुणावर कराव, रानावर वेलीवर स्वतःवर प्रेम जगावर कराव, प्रेम करायला शिकाव एका वकिल , एक डॉक्टराने , एक इजिनिअर एक डॉव्हर ने चुका केली तर जास्त काही फरक पडत नाही . पण जर शिक्षकाने चुका केली आणि शिक्षक चुकला तर संपुर्ण एक पिढी उद्धवस्त होत असते. म्हणून जीवन जगताना कौशल्य अवगत येणे अवश्यक आहे. भाषा भाषेतील शब्द आणि त्यांची ताकद ओळखता आली पाहिजे .भारताचे माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्ण याचा जन्म दिवस शिक्षक दिन म्हणूण साजरा करण्यात यावेळी प्रा डॉ शंकर विभूते बोलताना मत व्यक्त केले .

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. लहाने सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ . प्रशांत कांबळे तत्त्वज्ञान विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ . माधव कांबळे , प्रा सोनकांबळे सर सांस्कृतीक विभागाचे सर्व पदाधिकारी डॉ केंदा के के. , डॉ नवनाथ मुसळे , डॉ दत्तात्रय टिमकीकर ,प्रा पाटील एस डी मॅडम , प्रा अभिजित बचुटे , याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते . पुढे बोलताना डॉ.शंकर विभूते म्हणाले भाषा कशी वापरावी ' प्रत्येक भाषेची एक ताकद असते . भाषा गोड आहे आहे , कडू आहे , तिखट आहे . ती ताकद ओळखा आणि त्यांचा योग्य वापर करा विध्यार्थी मित्रानो महाविद्यालयीन जीवनात आपण आपली गुणवत्ता सिद्ध करा गुणवान आणि आणि विद्यवान लोकाना जग पुजते . पुर्ण जग आदर आणि सलाम करत असते . म्हणून गुणवान आणि विद्वान होण्यासाठी आपण आयुष्य वेचावेत . मित्रानोनेहमी अंगी आत्मविश्वास जिद्ध मनामध्ये बाळगा तुमच्याकडे प्रतिभा आणि प्रचंड बुद्धीमत्ता असेल तर यश तुमचेच आहे .अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ बी टी लहाने म्हणाले विध्यार्थ्यानी नेहमी विद्येची कास धरावी आणि आपण आपले जीवन समृद्ध करावेत . वाचन , लेखन, मनन, चिंतन करणे आज जवळपास दुर्मिळ झाले आहे . ते आशा कार्यक्रमातून कुठे तरी जीवंत होणे गरजेचे आहे . आई वडीलाने दिलेले सल्ले मार्गदर्शन आज पावलो पावली कामी पड़त आहे. मित्रानो आठवड्यातून कमीत कमी एक तरी पुस्तक वाचा पुस्तकाना जवळ करा , आणि आपणास जर शक्य झाले तर आज पासून काही वेळा पुरता का होईना मोबाईला स्वतः पासन दुर करा असा मोलाचा संदेश विध्यार्थ्याना दिला या प्रसंगी नवप्रवेशित विध्यार्थाना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले . याप्रसंगी बी ए बी कॉम बी एस्सी व्दितीय व तृतीय वर्षाचे विध्यार्थ्या बरोबरच महाविद्यालयात बी .ए , बी . कॉम ., बी .एससी. प्रथम वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थी तथा महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा सोनाबाई पाटील मॅडम यांनी तर आभार प्रा डॉ प्रशांत कांबळ यांनी मानले.

# ३२ लाख ३३ हजारांची रक्कम व्याजासह वसुलीचे आदेश

## बनावट कामे दाखवून निधीचा गैरवापर केल्याचे चौकशीत स्पष्ट

चाकूर। प्रतिनिधी

तालुक्यातील कलकोटी ग्रामपंचायतीत मनरेगा योजनेंतर्गत झालेल्या ३२ लाख ३३ हजार रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी अखेर प्रशासकीय कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३९ (१) अन्वये विद्यमान सरपंच तुकाराम कांबळे यांना पदावरून अपात्र घोषित करण्यात आले असून, गटविकास अधिकाऱ्यांपासून ग्रामसेवकापर्यंत नऊ अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या चौकशीचे आदेश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत.कलकोटी येथील नागरिक दयानंद महादेव मुके व सुधाकर राम कोपले यांनी या प्रकरणातील गैरप्रकाराचा पर्दाफाश करीत जिल्हा परिषदेकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी २७ जानेवारी २०२६ रोजी सरपंचाविरुद्ध अपात्रतेचा प्रस्ताव पाठविला होता. या प्रकरणाचा सखोल चौकशी अहवाल २९ एप्रिल २०२६ रोजी विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आला होता.

चौकशीत मनरेगा अंतर्गत कोणत्याही प्रत्यक्ष पाहणी, जिओ–टॅगिंग किंवा ग्रामसभेच्या मान्यतेशिवाय ४७ बनावट गाय गोठ्याचे काम दाखविण्यात आल्याचे समोर आले. या कामांच्या नावावर ३२ लाख ३३ हजार १६० रुपये खर्च झाल्याचे दाखविण्यात आले. तसेच मजुरांच्या कुशल कारागिरीची ३२,३३,१६० रुपयांची रक्कम थेट अंजनसोंडा (बु.) येथील 'केदार ट्रेडर्स' या खासगी सप्लायरच्या खात्यात वर्ग करण्यात आल्याचेही चौकशीत निदर्शनास आले.पंचायत समितीचा दबाव असल्याचा सरपंचांचा युक्तिवाद आयुक्तांनी फेटाळून लावला. वित्तीय अनियमितता तसेच कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत सरपंचांना अपात्र ठरविण्यात आले आहे. संबंधितांकडून घोटाळ्याची संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करून शासकीय तिजोरीत जमा करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.कलकोटी ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी जे. ए. साबदे यांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले असून, संबंधित तांत्रिक सहाय्यकाची सेवा समाप्त करण्यात आली आहे. याशिवाय या प्रकरणाशी संबंधित इतर अधिकारी–कर्मचाऱ्यांचीही चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकरणात बीडीओ, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, कनिष्ठ व सहाय्यक लेखाधिकारी, लिपिक, डेटा एंट्री ऑपरेटर आणि मनरेगा कक्षातील वरिष्ठ सहाय्यक अशा नऊ अधिकारी–कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.कलकोटीतील नागरिकांनी केलेल्या तक्रारीमुळे मनरेगा कामातील हा प्रकार समोर आला. चौकशीनंतर सरपंचांवर अपात्रतेची कारवाई आणि संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यांवर चौकशीचे आदेश झाल्याने शासकीय निधीच्या गैरवापराला जबाबदार असणाऱ्यांवर आता पुढील कारवाई काय होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे वाजवल्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई

मंठा। प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्य उत्सव म्हणून घोषित केला असून, जालना जिल्ह्यात दि. १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २८२६ या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात येणार आहे. गणेशमूर्ती विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठ्या प्रमाणावर डीजेचा वापर केला जातो. त्यामुळे ध्वनी प्रदूषण होण्याची शक्यता लक्षात घेता ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

तसेच, ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन करून डीजे अथवा मोठ्या आवाजातील ध्वनी प्रणालीचा वापर करणाऱ्या गणेश मंडळांवर व संबंधित पदाधिकाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस अधीक्षक तेघबीरसिंह संधू यांनी दिला आहे.त्या अनुषंगाने मंठा तालुक्यातही गणेशोत्सव हा उत्साह, भक्ती व सामाजिक सलोखा जपणारा सण साजरा करताना सर्व गणेश मंडळांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून ध्वनी प्रदूषणमुक्त व शांततामय वातावरणात साजरा करावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी केले आहे.



# फिल्मी स्टाईलने खून केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

उदगीर / प्रतिनिधी

उदगीर तालुक्यातील मौजे चौंडी येथे घडलेल्या आणि संपूर्ण जिल्ह्यात प्रचंड खळबळ माजवणाऱ्या बाबू उर्फ सूर्यकांत यांच्या संशयास्पद खून प्रकरणाचा अखेर मे. अप्पर सत्र न्यायालयाने निकाल जाहीर केला आहे. अनैतिक संबंधांच्या संशयावरून संगनमत करून मारहाण व गळा आवळून खून केल्याचा गंभीर आरोप असलेल्या सर्वच्या सर्व ६ आरोपींची मे. अप्पर सत्र न्यायाधीश श्री. एन. जी. पाच्चे साहेब यांनी पुराव्या अभावी आणि साक्षीदारांमधील गंभीर विसंगती लक्षात घेऊन निर्दोष मुक्तता केली आहे.या निकालामुळे तक्रारदार व फिर्यादी पक्षाला मोठा झटका बसला असून, आरोपी पक्षाच्या कुटुंबात आणि समर्थकांमध्ये मोठा दिलासा व्यक्त केला जात आहे.प्रकरणातील मिळालेल्या माहितीनुसार, मौजे चौंडी (ता. उदगीर) येथील मयत बाबू उर्फ सूर्यकांत यांचा अनैतिक संशयाच्या कारणावरून आरोपींनी संगनमत करून दिवसाढवळ्या अत्यंत भीषण पद्धतीने खून केल्याचा आरोप करण्यात आला होता.



१. शुभम संजीव बिरादार २. बालाजी संजीव बिरादार ३. केवळबाई संजीव बिरादार ४. कचरू जीवन डोईफोडे ५. विलास जीवन डोईफोडे ६. लक्ष्मण जीवन डोईफोडे या आरोपींनी संगनमत करून स्वतःच्या शेतात मयत बाबू यांच्या डोळ्यात तिखट/मिरची पावडर टाकली, काठीने बेदम मारहाण केली आणि दोरीने गळा आवळून त्यांचा खून केला. यानंतर प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा पुरावा नष्ट करण्यासाठी मयताचा मृतदेह आरोपी केवळबाई हिच्या घरात नेऊन टाकला व घराला बाहेरून कुलूप ठोकले, असा धक्कादायक आरोप पोलीस तपासात करण्यात आला होता. तसेच मारहाण सोडवण्यासाठी आलेल्या गावकऱ्यांनाही जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप ठेवून पोलीस स्टेशन वाढवणा बु. येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.हा गुन्हा दिवसाढवळ्या, सर्वांसमोर 'फिल्मी स्टाईल'ने घडल्याचे सांगत गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मे. कोर्टाने आरोपी क्र. १ ते ३ (शुभम, बालाजी व केवळबाई) यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. त्यामुळे या तिघांविरोधात हा खून खटला न्यायालयीन बंदीस्त (जेलमध्ये) असतानाच चालवण्यात आला. गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षाने एकूण ११ महत्त्वाच्या साक्षीदारांची तपासणी करण्यात आली.तर आरोपींच्या बचावासाठी २ साक्षीदारांची तपासणी करण्यात आली.सुनावणी दरम्यान बचाव पक्षाच्या निष्णात वकिलांनी सरकार पक्षाच्या साक्षीदारांमधील गंभीर परस्परविरोधी विसंगती, घटनेच्या वेळेबाबतचे अस्पष्ट पुरावे आणि आरोपींच्या बचावाचे भक्कम मुद्दे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून मा. अप्पर सत्र न्यायाधीश श्री. एन. जी. पाच्चे साहेब यांनी ऐतिहासिक निकाल देत, आरोपींविरोधात खुनाचा गुन्हा सिद्ध होण्यास पुरेसा व निनावी पुरावा नसल्याचे स्पष्ट करत सर्व ६ आरोपींची निर्दोष मुक्तता केली.या गाजलेल्या आणि अत्यंत गुंतागुंतीच्या खून खटल्यामध्ये आरोपींच्या बाजूने खालील कायदेतज्ज्ञांनी काम पाहिले जेल बंदीस्त आरोपी क्र. १ ते ३ च्या वतीने नामवंत विधीज्ञ ॲड. एस. एस. हुल्ले वायगावकर यांनी बाजू मांडली.आरोपी क्र. ४ ते ६ च्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जगन्नाथ चिताडे यांनी प्रभावी काम पाहिले. या खटल्यात विधीज्ञ ऐश्वर्या ऐ. कापसे आणि विधीज्ञ उत्कर्ष एस. हुल्ले यांनी मोलाचे कायदेशीर सहकार्य केले.दिवसाढवळ्या घडलेला खून आणि संपूर्ण तालुक्यात झालेली चर्चा या पार्श्वभूमीवर, उच्च न्यायालयात/सत्र न्यायालयात कायद्याच्या कसोटीवर सरकारी पक्षाला आपला आरोप ठामपणे सिद्ध करता आला नाही. संशयाच्या आधारावर नाही तर प्रत्यक्ष पुराव्याच्या आधारावरच न्याय दिला जातो, हेच या निकालातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सय्यद शादुल यांची निवड



दिपक कांबळे

अहमदपूर: अहमदपूर तालुक्यातील वायगाव येथील जिल्हा परिषद शाळेत मुरलीधर नरवाडे दिगांबर बालवाड दिपक कांबळे आनंद कंजे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी सय्यद शादुल बाबामिया तर उपाध्यक्ष म्हणून गंगा रामचंद्र गुंडरे तर सदस्य म्हणून मोहन बालाजी फांजेवाड बालाजी नरसिंग घंटेवाड मेहनजबी मिनाज शेख स्वाती रविकांत शेंडगे संजय अंकुश कांबळे गंगासागर गजानन वाडकर वर्षा वैजनाथ तोगरे कुसुम बापूराव कांबळे मुरलीधर ज्ञानोबा नरवाडे दिगंबर हनुमंतराव बालवाड हुसेन नवासाब मुजावर मेघा भिमराव डबेटवार सचिव म्हणून यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली यावेळी जिल्हा परिषद शाळेत पालक सभा घेण्यात आली यावेळी सर्वानुमते चर्चा होऊन अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्याची निवड करण्यात आली या निवडीबद्दल सर्व पदाधिकारी यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

# छत्रपती संभाजी महाराज चौकात दारुड्यांचा उच्छाद

## कर्तव्यावर निघालेल्या होमगार्ड गोरख भारस्कर यांच्यावर विटांनी जीवघेणा हल्ला

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहराच्या मध्यवर्ती आणि सर्वात वर्दळीच्या असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौकात दारुड्यांच्या उच्छादाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. दि. ४ सप्टेंबर शुक्रवार रोजी रात्री ठीक ८.१० वाजताच्या सुमारास कर्तव्यावर जाण्यासाठी निघालेल्या होमगार्ड जवानावर दारुड्या इसमाने विटांनी हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. होमगार्ड गोरख केशव भारस्कर (वय अंदाजे ४८) हे आपल्या कर्तव्यावर जाण्यासाठी आपले सहकारी होमगार्ड माने यांची वाट पाहत छत्रपती संभाजी महाराज चौकात थांबले होते. त्यांनी आपल्या हातातील काठी राजमाता टपरीवर ठेवली आणि बाजूच्या बोळीत लघुशंकेसाठी गेले.

परत येत असताना देशी दारू दुकानासमोर रस्त्यालगत झोपलेल्या सचिन काळे (वय अंदाजे ४४, रा. इंदिरानगर) या व्यक्तीस त्यांनी ''इथे रस्त्यावर असे का झोपलास, उठून घरी जा'' असे समजावून सांगितले. याचाच राग मनात धरून सचिन काळे याने ''तू कोण आहेस? तुला काय करायचंय?'' असे म्हणत अरेरावी केली आणि बाजूला पडलेल्या विटा उचलून गोरख भारस्कर यांच्यावर सपासप हल्ला चढवला.

हा प्रकार क्षणात घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आणि मोठ्या प्रमाणात गर्दी जमा झाली. घटना घडली तेव्हा गोरख भारस्कर हे होमगार्डच्या वर्दीवर पांढरा शुभ्र शर्ट घालून होते. हल्ल्यात त्यांचा शर्ट रक्ताने पूर्णपणे माखला गेला होता. जखमी अवस्थेत त्यांना तात्काळ चौकातील शिवतीर्थ हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. माजलगाव शहरासह परिसरातील वातावरण दिवसेंदिवस भयभीत होत चालले असून नागरिक अशा घटनांनी त्रस्त झाले आहेत. काही दिवसांपूर्वीच माजलगाव शहर पोलीस व होमगार्ड कर्मचाऱ्यांसोबत मारहाण, शिवीगाळ झाल्याची चर्चा होत असतानाच हा प्रकार घडल्याने ''जे रक्षण करतात, तेच सुरक्षित नाहीत, तर सामान्य जनतेचे काय?'' असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

शहरातील वाढत्या दहशतीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी विशेष पथकाची नेमणूक करून कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांमधून होत आहे.दरम्यान, वृत्त हाती येईपर्यंत या घटनेचा कोणताही गुन्हा माजलगाव शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आलेला नव्हता. या घटनेचा अधिक तपास माजलगाव शहर पोलीस करत आहेत.



**चौकातच दारुड्यांचा अड्डा**

शहरातील मुख्य चौक असलेल्या या परिसरात दारुड्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक येथील देशी दारू दुकान,धरण परिसरातील ऋतुगंध वाईन शॉप व छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रामा वाईन शॉप परिसरात सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत दारुड्यांचा मोठ्या प्रमाणावर उच्छाद सुरू असतो.

या परिसरातील काही छोटी हॉटेल्स, टपरी, अंडा-ऑम्लेट, नूडल्स-चिकनच्या गाड्यांवर पाण्याच्या बाटल्या व दारू पिण्यासाठी युज अँड थ्रो ग्लास राजरोसपणे विकले जातात. त्यामुळेच हे दारुडे याच परिसरात तासनतास ठाण मांडून बसतात.

### महिला, शाळकरी मुलींची सुरक्षितता धोक्यात!

शहराच्या मुख्य ठिकाणी असलेल्या या भागात महिला व शाळकरी मुलींची मोठी वर्दळ असते. कॉलेज, क्लासेस आणि बाजारपेठेकडे जाणारा हा मुख्य रस्ता आहे. दारुड्यांच्या शिवीगाळ आणि अश्लील वर्तनामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### अनधिकृत बॅनरमुळे सीसीटीव्हीलाही अडथळा

शहरासह इतर भागात वाढदिवस, जयंती व जाहिरातीचे अनधिकृत बॅनर मोठ्या प्रमाणात लावण्यात आले आहेत. त्यामुळे एखादी घटना घडल्यास ती सीसीटीव्हीत कैद होताना या बॅनरचा अडथळा येतो. गुन्ह्याचा तपास करण्यास अडचण निर्माण होते. त्यामुळे नगरपालिकेने या अनधिकृत बॅनरवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

# केजमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी दोन कोटींचा निधी मंजूर

बीड । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक केज येथे उभारण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यासंदर्भातील शासन आदेशही पारित करण्यात आला असून केज येथील शिवप्रेमींच्या मागणीला अखेर यश आले आहे.

केज शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी शिवप्रेमींकडून सातत्याने करण्यात येत होती. या निधीसाठी संपर्कप्रमुख मनोज शिंदे, उपनेत्या संगीताताई ठोंबरे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक , महिला आघाडी जिल्हाप्रमुख प्रतिभाताई थोरात यांच्यासह शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सातत्याने प्रयत्न व पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना ◀◀ पान २ वर



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवप्रेमींनी मानले आभार

# गोदावरी पात्रातून होणाऱ्या अवैध वाळू वाहतुकीवर 'एलसीबी'चा छापा



## दोन हायवासह ६० लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड / उमापूर । प्रतिनिधी

गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीवर बीड स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत दोन भारत बेंझ कंपनीचे हायवा पकडले आहेत. उमापूर शिवारामध्ये सापळा रचून करण्यात आलेल्या या कारवाईत तब्बल ६० लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन जणांविरुद्ध चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील नदीपात्रांमधून सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर कडक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना, ◀◀ पान २ वर

# दुष्काळ जाहीर करून, नुकसान भरपाई द्या - आमटे

## पिक विमा व कृत्रिम पावसासाठी शेतकरी हक्क मोर्चा आंदोलन करणार



बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे पावसाअभावी पीक करपून चाललेत सोयाबीन पिकाचा वाटोळं झाला कापूस पीक थोडीफार तग धरून आहे पाऊस पडला नाही तर शेतकऱ्यांच्या हातातून कापसाच पिक हि जाईल सरकारने तत्काळ उपाययोजना करून कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा तर शेतकऱ्यांची पिक वाचतील सरकारने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांचे पावसा अभावी झालेले पिकाची नुकसान भरपाई देण्यात यावी या करिता शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड तालुक्यातील नाळवंडी येथे आयोजित बैठकीत राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केले

मागील वर्षे अतिवृष्टी मध्ये शेतकऱ्याला पिक विमा मधून हेक्टरी १७ हजार रुपये मदत देऊ अशी घोषणा सरकारने केली होती यानंतर पालकमंत्री व उपमुख्यमंत्री सुमित्राताई यांनीही मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन पीक विम्याचा प्रश्न सोडू असे आश्वासन दिले होते परंतु अद्याप शेतकऱ्याचा पिक विमा चा प्रश्न सोडवण्यात आलेला नाही. तात्काळ दुष्काळ जाहीर ◀◀ पान २ वर



महसूल सहाय्यक पदासाठी निवड झालेल्या राहुल जाधव यांचा ढेकणमोहा येथे सत्कार

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाळवडी येथील शेतकरी कुटुंबातील राहुल विलास जाधव यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत () घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत टॅक्स असिस्टंट (महसूल सहाय्यक) पदावर निवड मिळवली आहे. सध्या ते मुंबई येथे जीएसटी अधिकारी म्हणून कार्यरत झाले असून, त्यांच्या या यशाबद्दल ढेकणमोहा येथे त्यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला.

राहुल जाधव यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश मिळवले. शेतकरी कुटुंबातून आलेल्या ◀◀ पान २ वर

# नेकनूर येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा

नेकनूर । प्रतिनिधी

मूकबधिर निवासी शाळा, नेकनूर (ता. जि. बीड) येथे ५ सप्टेंबर रोजी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आपला आदर, कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिराम सर यांनी केले. सूत्रसंचालन कुलकर्णी सर यांनी केले. यावेळी खरंगुळे मॅडम यांनी मनोगत मधून डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विषयी माहिती सांगितली . डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी झाला. ते महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि भारताचे पहिले उपराष्ट्रपती व दुसरे राष्ट्रपती होते. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाचा सन्मान म्हणून त्यांचा जन्मदिवस भारतात 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व आणि समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.व्यक्त करून शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ◀◀ पान २ वर

# गुरुजनांच्या ऋणाची परतफेड; शिक्षकदिनी जि.प.शाळेतील शिक्षकांचा ग्रामस्थांकडून सन्मान

युसूफवडगांव । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देत त्यांच्या भवितव्याचा पाया मजबूत करणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात मुख्याध्यापक मुळे एस. व्ही., बांगर डी. एच., पोळ आर. एम., पाटील बी. डी., खोबरे एस. एम., खरबड एस. एम., कणसे एम. एन., चव्हाण व्ही. बी. व काळेबेरे ए. एम. या शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



'शिक्षक म्हणजे केवळ ज्ञान देणारी व्यक्ती नसून समाजाची भावी पिढी घडविणारा शिल्पकार आहे,' या भावनेतून ग्रामस्थांनी शिक्षकांचा गौरव केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि आत्मविश्वास देण्याचे काम शिक्षक सातत्याने करीत आहेत. त्यांच्या योगदानामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळत असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

या कार्यक्रमास उपसरपंच महेश लामतुरे, माजी शिक्षक जगन्नाथ जोशी, भगवान जोशी, बबन शिंदे, सूर्यकांत राऊत, ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत भुसारी, ओमकार लामतुरे, अशोक चोपणे, प्रविण वैरागे, अनिल उजगरे, जयराज निशिगंध, राजू गायके, राचलिंग पाटील, खंडू डोंगरे व मयूर खंडेलवाल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करण्याची युसूफवडगाव ग्रामस्थांची ही परंपरा समाजात गुरु-शिष्य नात्याचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली.

# अवैध मुरूम वाहतुकीवर वडवणी पोलिसांची धडक कारवाई!

## चिंचोटी तलाव परिसरात हायवा पकडला; चालक-मालकाविरुद्ध गुन्हा, ३० लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त

वडवणी । प्रतिनिधी

चिंचोटी तलाव परिसरातून अवैधरीत्या मुरूम उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळताच वडवणी पोलिसांनी धडक कारवाई करत मुरूमाने भरलेला हायवा पकडला. या कारवाईत हायवा व मुरूम असा एकूण ३० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, चालकासह वाहन मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास चिंचोटी परिसरातील चिंचोटी तलाव येथे अवैध मुरूम वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती प्रभारी अधिकारी वर्षा व्हगाडे यांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने सदर ठिकाणी छापा टाकला.

यावेळी चिंचोटी रोडवर -१७- -२६८१ क्रमांकाचा हायवा पोलिसांना आढळून आला. वाहनाची ◀◀ पान २ वर



# मोगरा ११ के.व्ही.ची वीजतार तुटून दिड एकर ऊस जळून खाक

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यातील मोगरा येथील ताडोबा शिवारात ११ के.व्ही. शिवाजीनगर फिडरची वीजतार तुटून शेतातील ऊसाला आग लागल्याची घटना दि ०५ सप्टेंबर शुक्रवार रोजी घडली आहे.या आगीत मोगरा शिवारातील कमलबाई आत्माराम जाधव यांच्या गट नं. ११५ मधील सुमारे दिड एकर क्षेत्रावरील ऊस जळून खाक झाला. वीजतार तुटल्याने ठिणग्या पडून ऊस पेटल्याचे सांगण्यात येत आहे.आगीमुळे शेतकऱ्याचे हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित विभागाने पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यास तातडीने नुकसानभरपाई द्यावी,अशी मागणी होत आहे.

# दोन वर्षांपासून रखडलेला प्रशांतनगरचा वीज पोल व तारांचा प्रश्न अखेर मार्गी



केज । प्रतिनिधी

शहरातील प्रशांतनगर परिसरातील नागरिकांना गेल्या दोन वर्षांपासून भेडसावत असलेला विद्युत पोल व तारांचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर नवीन विद्युत पोल उभारून तारांचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशांतनगर परिसरातील विद्युत व्यवस्थेशी संबंधित समस्या गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित होती. पोल व तारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांकडून सातत्याने प्रयत्न सुरू होते. अखेर या प्रयत्नांना यश आले असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करून विद्युत पोल उभारण्यात आले. या कामासाठी विद्युत अभियंता सय्यद मॅडम व अडील साहेब यांनी विशेष सहकार्य केले. तसेच लाईनमन तेलग दादा व लांब साहेब यांनी प्रत्यक्ष कामात महत्त्वाची भूमिका बजावली. गुत्तेदार वळसे पाटील तसेच त्यांचे मॅनेजर खातीब साहेब यांनीही काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक सहकार्य केले. विशेष म्हणजे, प्रशांतनगरचे सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे, संजय कोरडे व अशोक गवळी यांनी सलग दोन दिवस प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून ◀◀ पान २ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26